*मार्गदर्शक सूचना*
*पकृवियो २०१८-१९*

जा.क्र.कृआ/सेंशेयो/प्रक्र- २०१८-१९/मासू/३८९/२०१८
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -५
दिनांक १२ जून २०१८

**प्रति,**

**१) विभागीय कृषि सहसंचालक**
---------- विभाग ---------- (सर्व)

**२) प्रकल्प संचालक, आत्मा**
------------जिल्हा ------- - (सर्व)

**विषय -** राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत परंपरागत कृषि विकास योजना (सेंद्रिय शेती) २०१८-१९ मध्ये गट/समूह पध्दतीने राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना .......

**संदर्भ –** १) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक ९-१५/२०१५/ओआरजी एफएमजी, कृषि, सहकार व किसान कल्याण मंत्रालय, आय.एन.एम. विभाग, कृषि भवन, नवी दिल्ली, दि. १५/०२/२०१५ व दि.२१/१२/२०१५ च्या आंग्लभाषीय मार्गदर्शक सूचना

२) महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सेंशेयो २०१४/ प्र.क्र.२६६/१७-ए, मंत्रालय, मुबई -३२ दि. २०/०२/२०१६ व दि.२५/०७/२०१६

३) महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सेंशेयो १२१७/ प्र.क्र.२१०/१७-ए, मंत्रालय, मुबई -३२ दि. २४/०१/२०१८ व दि.२९/०१/२०१८

४) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्रमांक सेंशेयो/प्र.क्र.०१/मा.सू./२०१७-१८/३१०/१७, पुणे दि. १३/०४/२०१७ व सुधारीत पत्र क्रमांक ५६६/२०१७, दि.२७/०९/२०१७

उपरोक्त संदर्भिय १ नुसार केंद्र शासनाकडील एकत्रित सविस्तर मार्गदर्शक सूचना देशपातळीवर निर्गमीत करण्यातआल्या होत्या, त्यास अनुसरुन राज्य पातळीवरील स्थानिक भाषेतील सविस्तर मार्गदर्शक सूचना तयार करयात येऊन आपणास या कार्यासनाचे पत्र क्रमांक १४६/२०१६ दिनांक ०४/०३/२०१६ व ३१८/२०१६ दिनांक २६/०४/२०१६ नुसार प्रथम वर्षीच पाठविण्यात येऊन संदर्भिय ४ अन्वये द्वितीय वर्षात सुधारीत मार्गदर्शक सूचनेसहित पुनश्च निर्गमीत करण्यात आल्या.

सन २०१६-१७ ते २०१८-१९ या सलग तीन वर्षाच्या कार्यक्रमासाठी एकूण ९३२ गट/समूह स्थापित केले असून सदर गटांचा कार्यक्रम राबविण्यास संदर्भिय २ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, तसेच सन २०१७-१८ ते २०१९-२० या सलग तीन वर्षाच्या कार्यक्रमासाठी एकूण ३२६ गट/समूह स्थापित केले असून सदर गटांचा कार्यक्रम राबविण्यास संदर्भिय ३ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे,

राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत परंपरागत कृषि विकास योजना (सेंद्रिय शेती) कार्यक्रम राज्यात सन २०१६-१७ पासून सुरु झालेला असून यामध्ये ५० शेतक-यांचा ५० एकर क्षेत्राचा एक गट याप्रमाणे गट/समूह सहभाग हमी पध्दतीने राबविण्यासाठी प्रथम टप्प्यातील स्थापित ९३२ गट/समूहाचे सन २०१८-१९ हे तिसरे वर्ष असून दुस-या टप्प्यातील नव्याने स्थापित ३२६ गटांचे सन २०१८-१९ हे द्वितीय वर्ष आहे, तथापि सदर ३२६ गटांचे नियोजन उशीरा करण्यात आल्याने व गटासाठीचे सन २०१७-१८ मधील प्रथम वर्षाचे अनुदानही मार्च २०१८ अखेरीस मुक्त झाल्याने प्रथम वर्षाच्या बाबी राबविण्यात आलेल्या नाहीत, त्यास अनुसरुन केंद्र शासनास प्रस्ताव सादर केला असून तो मान्य झाल्यास नव्याने स्थापित ३२६ गटांचे सन २०१८-१९ हे प्रथम वर्ष समजण्यात येऊन त्यापुढील सलगची दोन वर्षे हे गट कार्यरत असतील.

प्रथम टप्प्यातील स्थापित ९३२ गट/समूहाचे प्रथम वर्षाचे अनुदान संपूर्णपणे वितरीत करण्यात आले असून द्वितीय वर्ष सन २०१७-१८ मधील उर्वरीत घटक राबविणेसाठीचे त्या वर्षातील शिल्लक राहिलेले जवळपास ४० टक्के अनुदान व सन २०१८-१९ मधील तिस-या वर्षाच्या कार्यक्रमासाठी लागणारे संपूर्ण अनुदान केंद्र/राज्य शासनाकडून प्राप्त होताच आपणास वितरीत करण्यात येईल. या व्यतिरीक्त दुस-या टप्प्यातील स्थापित ३२६ गट/ समूहाचे प्रथम वर्षाच्या कार्यक्रमासाठीचे ५० टक्के अनुदान मुक्त असून सदरचा निधी पुनरुज्जीवीत करणेस्तव केंद्र शासनास प्रस्ताव सादर केला आहे. तसेच उर्वरीत ५० टक्के अनुदान व द्वितीय वर्षासाठी लागणारे संपूर्ण अनुदान प्राप्त होणेसाठी पाठपुरावा सुरु असून सदरचे अनुदान केंद्र/राज्य शासनाकडून प्राप्त होताच आपणास वितरीत करण्यात येईल.

योजनेतील सर्व बाबींचे अनुदान आता शासन निर्णय क्रमांक पीएफएम-२०१७/प्र.क्र.४५/१७/२ ए, मुंबई दिनांक २७/०९/२०१७ व क्रमांक पीएफएम-२०१७/प्र.क्र.४५/१७/भाग-१/२ ए, मुंबई दिनांक ०९/११/२०१७ नुसार पीएफएमएस प्रणालीमधून द्यावयाचे असून त्यामधील बाब क्रमांक १.२.७, २.१.१, २.१.२, २.१.३, २.१.४, २.१.५, २.२.१, २.२.२, २.२.३, २.२.४, २.२.५ व २.३.१ मधील अनुदान डीबीटी द्वारा वर्ग करावयाचे आहे. तसेच बाब क्रमांक २.२.५ मध्ये ९३२ गटांसाठी बायोडायनामिक ही बाब अंतर्भूत असून ३२६ गटांमधून वगळण्यात आल्याने तीन वर्षाच्या कार्यक्रमाचे नियोजन प्रति गट रु. १४.९५ लाख अनुदान येणेप्रमाणे राहील.

| अ.क्र. | गट संख्या | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९३२ | ६,५६,७४० | ५,२३,६७० | ३,१४,५९० | १४,९५,००० |
| २ | ३२६ | ७,०६,७४० | ४,९८,६७० | २,८९,५९० | १४,९५,००० |

घटकांतर्गत अंतर्गत बाब बदलाची कार्यवाही यापुढे जिल्हा स्तरावरील समितीमध्ये निर्णय घेऊन पार पाडावी. स्थापित ९३२ गटांसाठीचे सन २०१८-१९ हे तिसरे वर्ष असल्याने दुस-या वर्षातील बाब क्रमांक २.४.२ अंतर्गत वाहन खरेदी क्षमता याचाही निर्णय आपले स्तरावरील समितीमार्फत घ्यावा. बाब क्रमांक २.४.१ अंतर्गत सेंद्रिय शेतीमाल उत्पादनासाठी लोगो तयार करावयाचा आहे. संबंधित जिल्हयाने स्वतःचे जिल्हयाचा उल्लेख करुन राज्य स्तरावरील एकच लोगो बनविण्यासाठी आपले स्तरावरुन नियोजन करुन कृषि आयुक्तालयास अवगत केल्यास त्याप्रमाणे राज्याचा स्वतंत्र सेंद्रिय उत्पादनाचा लोगो तयार करता येईल.

तसेच जोडपत्र ‘अ’ मधील घटक / बाबी या एका गटासाठी असून प्रत्येक गटासाठी येणा-या खर्चाची नोंद स्वतंत्र ठेवण्यात यावी तसेच जोडपत्र ‘अ’ मध्ये दिलेल्या क्रमानेच बाबी राबविण्याची दक्षता घ्यावी. यापुढे राज्य स्तरावरुन दिलेल्या प्रपत्रानुसारच दर महिन्याच्या ५ तारखेपूर्वी अहवाल सादर करावेत. तसेच सदर योजनेची वित्तीय मान्यता व प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्याशिवाय कोणत्याही घटकांवर खर्च करण्यात येऊ नये.

**सोबत** - वरीलप्रमाणे

**कृषि संचालक**
निविष्ठा व गुण नियंत्रण
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत** -

१) अवर सचिव, १७-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर
२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ... (सर्व) यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**

# मार्गदर्शक सुचना

## राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत परंपरागत कृषि विकास योजना (सेंद्रिय शेती) (PKVY)

## सन २०१८-१९

## ९३२ स्थापित गट - - तृतीय वर्ष

## ३२६ स्थापित गट - - प्रथम वर्ष

**कृषि आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | परंपरागत कृषि विकास योजनेंतर्गत सेंद्रिय शेती - प्रस्तावना | १ |
| २ | परंपरागत कृषि विकास योजनेंतर्गत सेंद्रिय शेतीचा उद्देश | १ |
| ३ | परंपरागत कृषि विकास योजनेंतर्गत सेंद्रिय शेतीची वैशिष्टये | २ |
| ४ | योजना अंमलबजावणीची पध्दत, गट/ समूहाची रचना | २ |
| ५ | लाभार्थी व गट निवडीचे निकष | २ |
| ६ | गट समूहाची निवड, गट मार्गदर्शकाची निवड, शेतकरी गट प्रशिक्षण | ३-४ |
| ७ | सहभागी हमी पध्दती | ४ |
| ८ | आत्मा यंत्रणेने करावयाची अंमलबजावणी | ५ |
| ९ | पी.जी.एस.प्रणालीमध्ये प्रादेशिक परिषद निवड | ६ |
| १० | निधीचे/अनुदानाचे वितरण, शासकीय स्तरावरुन योजनेचे नियोजन आहरण व संवितरण. | ६-७ |
| ११ | योजनेसंबंधीत प्रसिध्दी, योजनेच्या कामाची तपासणी, माहिती उपलब्धता व अहवाल सादर करणे. | ८ |
| १२ | योजना अंमलबजावणी करीता पुढील वेगवेगळया स्तरावर करावयाची जबाबदारी- १) प्रकल्प संचालक आत्मा २) विभागीय परिषद ३) कार्यान्वयन संस्था. | ९ |
| १३ | योजनेचे भौतिक व आर्थिक उदिष्ट कार्यक्रम माहिती, गट / समूह पध्दतीने सेंद्रिय शेती - **फलश्रुती** | १० |
| १४ | योजनेचे भौतिक व आर्थिक उदिष्ट (**जोडपत्र 'अ'**) | ११-१८ |
| १५ | जिल्हानिहाय गट/समूह निर्मिती आराखडा (**जोडपत्र 'ब'**) | १९ |

# मार्गदर्शक सुचना
# राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत परंपरागत कृषि विकास योजना
# (सेंद्रिय शेती) (PKVY)
# सन २०१८-१९

**प्रस्तावनाः-**

. कुठल्याही शेतीमालाची उत्पादकता ही त्या शेतीमालाच्या बाजारभावावर अवलंबून असते. सेंद्रिय शेती मालाला जर चांगली बाजारपेठ उपलब्ध झाली, तर सेंद्रिय माल पिकविण्याकडे शेतक-यांचा कल नक्कीच वाढलेला दिसेल, यात शंका नाही. शेतीमालाच्या विक्रीचा विचार आपण केला तर तो सामान्य ग्राहकाच्या कसा पसंतीस उतरेल याचा विचार केला पाहिजे. आपण जर ग्राहकाच्या भूमिकेतून पाहिले, तर सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आपण घेतलेला शेतीमाल हा आरोग्यवर्धक असेल का ? असा प्रश्न ग्राहकाला पडतो. आज रासायनिक खते, किटकनाशके, संजीवके यांचा वापर करुन माल पिकविला जातो, त्यातून पिकविलेला माल जरी दिसावयास चांगला व आकर्षक असला, तरी तो रासायनिक अवशेषयुक्त असेल तर कर्करोग, चेतापेशींचे आजार आणि लहान बालकांमधील मतिमंदत्व यासारख्या असाध्य शारीरिक व्याधींना निमंत्रण देणारा असतो.

सेंद्रिय शेतीत कोणत्या निविष्ठा वापरावयाच्या, पिकाची मशागत कशी करावयाची, शेतीमाल बाजारात कसा विकायचा, ग्राहकाला त्या सेंद्रिय शेतीमालाची विश्वसनीयता कशी पटवून द्यायची असे अनेक प्रश्न सेंद्रिय शेती उत्पादकाला पडतात. या प्रश्नांची उत्तरे ही सेंद्रिय शेती प्रमाणिकरण या माध्यमातून मिळतात. सेंद्रिय शेती प्रमाणिकरण ही सेंद्रिय शेतीमालाच्या उत्पादकापासून ते ग्राहकापर्यंतची साखळी आहे.

सेंद्रिय शेतीचे प्रमाणिकरण हे विविध पध्दतीने करता येते, त्यामध्ये तृतीय पक्ष (third party) प्रमाणिकरण व दुसरी पध्दत म्हणजे भारतीय सेंद्रिय सहभागीता हमी प्रमाणिकरण प्रणाली पध्दत – पीजीएस - (Participatory Guarantee System) हया पध्दती आहेत. प्रामुख्याने सेंद्रिय शेतीचे प्रमाणिकरण कमी खर्चाने व एकत्रितपणे करणे लहान व मध्यम शेतक-यांच्या उन्नतीसाठी महत्वाचे आहे. शेतकरी योग्य रितीने सेंद्रिय शेतीगट संघटीत करुन त्यांच्या शेतीचे व शेतीमालाचे प्रमाणिकरण करु शकतात. अशा भारतीय सेंद्रिय शेती सहभागी हमी प्रमाणिकरण प्रणाली पध्दतीचा वापर करुन प्रमाणिकरण करण्यासाठी सन २०१४-१५ पासून नव्याने विस्तार व तंत्रज्ञान अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत जमीन आरोग्य व्यवस्थापन अभियान येत असल्याने व सेंद्रिय शेती जमीन आरोग्य व्यवस्थापन उपअभियानाशी सबंधित असल्यामुळे सेंद्रिय शेती विषय सदर अभियानांमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

**१) योजनेचे उद्देशः-**

सेंद्रिय शेती म्हणजे जिवंत पर्यावरणीय रचना आणि जीवनचक्रास समजून घेऊन व रसायनांचा वापर टाळून केलेली एकात्मिक शेतीपध्दती होय. राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये हा प्रकल्प भारत सरकारच्या कृषि व सहकार मंत्रालयाच्या एकात्मिक पोषण व्यवस्थापन विभागाच्या पंरपरागत कृषि विकास योजनेतून साध्य करावयाचा आहे. हया योजनेतून पीजीएस प्रणाली पध्दतीने सेंद्रिय शेती करुन तिचे प्रमाणिकरण करणे तसेच सेंद्रिय शेतीसाठी सेंद्रिय गट निर्मिती करणे व ग्राहकाला रसायनमुक्त खात्रीशीर उत्पादन मिळणे हा मुख्य उद्देश आहे.

**२) योजनेची वैशिष्टये:-**

२.१. सेंद्रीय शेती माध्यमातून व्यावसायिक सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे.

२.२. राज्यातील शेतक-यांना सेंद्रिय निविष्ठा वापरण्यास प्रोत्साहन देणे.

२.३. सहभाग हमी पध्दतीने (Participatory Guarantee System -PGS) प्रमाणिकरण करणे.

२.४. शेतक-यांच्या शेतावर सेंद्रिय शेती निविष्ठा तयार करणे.

२.५. सेंद्रिय निविष्ठांचा पुरवठा करणे.

२.५. सेंद्रिय शेतमालाची विक्री व्यवस्था करणे.

२.६. कमी खर्चाच्या तंत्रज्ञानाचा अवलंब करुन शेतक-यांचा उत्पादन खर्च कमी करुन आर्थिक उत्पन्न वाढविणे.

२.७. रासायनिक किटकनाशक उर्वरित अंशमुक्त शेतमाल ग्राहकास उपलब्ध करुन देणे.

**३) योजनेची अंमलबजावणी पध्दत:-**

राज्यात सन २०१५-१६ पासून राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये परंपरागत कृषि विकास योजनेंतर्गत सेंद्रिय शेती ही सहभागी हमी पध्दतीने राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये अनुदानासाठी केंद्र सरकार हिस्सा ६० टक्के व राज्य सरकार हिस्सा ४० टक्के आहे. **सदरची योजना जिल्हा स्तरावर आत्मा यंत्रणेमार्फत राबविण्यात यावी.** याकरीता आत्मा यंत्रणेने हा कार्यक्रम स्वतः अथवा सेंद्रिय शेती पध्दतीमध्ये अनुभवी संस्थांमार्फत राबवावा. शेतकरी गट स्थापनेपासून ते विक्री व्यवस्थेपर्यतचा अनुभव असणा-या स्वयंसेवी संस्थेची निवड करण्यात यावी आणि त्यांचेमार्फत कार्यक्रमाची अमलबजावणी करण्यात यावी.

**४) गट/ समूहाची रचना:-**

भौगोलिक दृष्टया व दळणवळणास सोयीचे असलेल्या क्षेत्रामधून ५० एकर क्षेत्राचा ५० शेतक-यांचा एका गटामध्ये/समूहामध्ये समावेश करावा. निवडलेले क्षेत्र हे शक्यतोवर सलग क्षेत्र असावे.

**५) लाभार्थी व गट निवडीचे निकष- :-**

५.१ गटामध्ये भाग घेणा-या शेतक-याने तीन वर्षे सेंद्रिय शेती योजनेत भाग घेणे बंधनकारक राहील.

५.२ एक शेतक-यास १ एकर व जास्तीत जास्त २.५ एकरपर्यत लाभ घेता येईल.

५.३ रासायनिक किटकनाशके, रासायनिक खते वापरणार नाही असे प्रतिज्ञापत्र शेतक-यांनी लिहून देणे बंधनकारक करावे.

५.४ यापूर्वी सेंद्रीय शेती कार्यक्रमात भाग घेतलेल्या शेतक-यांना प्राधान्य देण्यात यावे.

५.५ एका गावातील पूर्ण गट हा महिलांचा होत असल्यास त्याला प्राधान्य देण्यात यावे.त्यामध्ये महिला बचतगट, शेती महिला मंडळयांचा समावेश करावा. त्याचप्रमाणे इतर ५० एकराचे गट करतांना त्यामध्ये १६ % अनूसुचित जाती व ८ % अनूसुचित जमातीच्या शेतक-यांची निवड करावी.

५.६ गटात समाविष्ट होणा-या शेतक-याकडे किमान दोन पशुधन असावे.

५.७ निवड करण्यात येणा-या शेतक-याकडे बँक खाते असावे.नसल्यास,बँक खाते उघडण्यास सांगावे. दि.१९/०४/२०१७ व दि. १२/०९/२०१७ चे शासन निर्णयान्वये डीबीटी प्रणाली लागू झाल्याने लाभार्थ्याचे बँक खात्यावर थेट अनुदान अदायगी करावयाची आहे.

५.८ कोरडवाहू व बागायती क्षेत्राचे स्वतंत्र गट करावे.त्यामध्ये कोरडवाहू क्षेत्राला प्राधान्य देण्यात यावे.

५.९ प्रत्येक लाभार्थ्याने दरवर्षी माती, पाणी तपासून घेणे बंधनकारक राहील.

५.१० अपारंपारिक उर्जास्रोताचा वापर करणा-या लाभार्थ्यास प्राधान्य देण्यात यावे.

५.११ एक गट/समूह शक्यतो भौगोलिक व दळणवळणाचे दृष्टीने सोयीचे असलेल्या क्षेत्रातील असावा जेणेकरुन हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी मदत होईल. आदिवासी व डोंगराळक्षेत्रात/राज्यामध्ये गट तयार करण्यासाठी/प्रकल्प राबविण्यासाठी प्रादेशिक परिषदेची मदत घ्यावी.

५.१२ सदर योजनेमध्ये आत्मा अंतर्गत कार्यरत असलेले गट/समूह शेतकरी उत्पादक कंपनी यांना सहभागी करुन घ्यावे.सदर योजनेमध्ये अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती गटांना प्राधान्य देण्यात यावे.

५.१३ मा.संसद सदस्य व विधान मंडळ सदस्य यांनी संसद ग्राम योजनेतंर्गत निवडलेल्या गावांचा या योजनेत प्राधान्याने सहभाग करण्यात यावा.

## ६) गट / समूहाची निवड :-

गटाची निवड कार्यक्षेत्रातील कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक तसेच तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) व स्थानिक अशासकीय संस्था यांनी एकत्रितपणे शेतक-यांशी चर्चा करुन इच्छुक शेतकरी गटाची प्राथमिक शिफारस करावी. अशा शेतक-यांची संपूर्ण माहिती (उदा.नाव, पत्ता, क्षेत्र, सर्वे नंबर, इत्यादी माहिती) सोबत दिलेल्या प्रपत्रामध्ये तयार करावी. सदरची माहिती तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापन (आत्मा) यांनी एकत्रित करुन तालुका कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावी. त्यानंतर तालुका कृषि अधिकारी कार्यालय स्तरावर गटाची शिफारस तालुकास्तरीय समितीमार्फत करण्यात यावी. व प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी जिल्हा समितीकडे सादर करावा.

अ) स्थानिक खाजगी संस्थांचा मागील तीन वर्षाचा सेंद्रिय शेतीविषयी अनुभव असल्यास अशा संस्थांचा सुध्दा कार्यक्रम राबविताना सहभाग घ्यावा. सदर संस्थांची नोंदणी प्रादेशिक सेंद्रिय शेती केंद्र, नागपूरयांचेकडे नोंदणी असलेल्या प्रादेशिक परिषदेकडे असणे आवश्यक आहे.

ब) आत्मा अंतर्गत कार्यान्वित असलेली शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये शेतकरी संख्या जास्त असते अशा वेळी त्यामधील इच्छुक शेतक-यांची निवड करावी व योजनेच्या निकषात बसेल असा गट / समूह तयार करावा.

क) निवडलेल्या गटाची संपूर्ण माहिती संगणकावर ऑनलाईन भरण्याची जबाबदारी तालुका स्तरावर तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापन (BTM) (आत्मा) यांची राहील.

ड) आत्मा यंत्रणा स्थानिक, खाजगी संस्थांच्या सहभागाविना सुध्दा कार्यक्रम राबवू शकते.परंतु प्रादेशिक सेंद्रिय शेती केंद्र यांनी ठरविलेले सेंद्रिय शेतीचे नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.

**शेतकरी गटांतर्गत निवड केलेल्या लाभार्थी शेतक-यांची माहिती खालीलप्रमाणे तक्त्यात भरावी .......**

| अ. क्र. | शेतकरी नांव पुर्ण पत्त्यासह व मोबाईल क्र. | वर्गवारी (एससी/ एसटी/ महिला/ सर्व साधारण ) | एकुण जमीन (८-अ नुसार) | अल्प/ अत्यल्प /इतर | समू-हात प्रस्ता-वित सर्वे क्र. | बागायत / जिरायत | बागायत असल्यास सिंचनाचा स्रोत | | | | | उपलब्ध साधने संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | विहीर | कॅनॉल | तलाव | बोडी | भिज -णारे एकूण क्षेत्र (हे.) | ट्रॅक्टर | पावर टिलर | पशुधन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |

**७) गट मार्गदर्शकाची निवडः-**

निवडलेल्या शेतक-यांच्या गटातून एका शेतक-याची गट मार्गदर्शक म्हणून निवड करावी. जेणेकरुन निवडलेला शेतकरी गटातील इतर शेतक-यांना सेंद्रीय शेतीविषयक प्रशिक्षण देऊ शकेल. उच्चशिक्षीत, कृषि पदवीधर, पदविका,/निवृत्त कृषि अधिकारी/कृषि विद्यापीठाचे प्राध्यापक/ शास्त्रज्ञ/ कृषि उत्पादक कंपनीचे प्रवर्तक/सेंद्रीय शेती पुरस्कार प्राप्त शेतकरी/ किमान एक वर्ष सेंद्रिय शेती अनुभव असलेले व्यक्ती-शेतकरी/नाबार्डअंतर्गत ॲग्रीपॉलीक्लिनीक व ॲग्रीबिझनेस सेंटर अभ्यासक्रम पूर्ण केलेले व्यक्ती / सेंद्रिय शेती अंतर्गत प्रवर्तकांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या अशासकीय व्यक्ती/मधुमक्षिका पालन प्रशिक्षण/ पशूधन व्यवस्थापन पदवीका अभ्यासक्रम/बीएससी मत्स्यव्यवसाय इ. पूर्ण केलेल्या व्यक्ती, ज्यांना संगणक विषयक ज्ञान आहे अशा शेतक-यांची गट मार्गदर्शक म्हणून निवड करावी.

गट मार्गदर्शकाची निवड गटातील सर्व शेतक-यांनी एकत्रित चर्चा करुन सर्वसंमतीने करावी.

**८) शेतकरी गट प्रशिक्षणः-**

शेतक-यांचे प्रशिक्षण हे कृषि विभाग (रामेती), प्रादेशिक परिषद अथवा मान्यता प्राप्त संशोधन केंद्रावर घेण्यात यावे. त्याचप्रमाणे सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये सेंद्रिय शेती धोरण योजनेंतर्गत एकूण यशस्वी शेतक-यांच्या शेतीवर सेंद्रीय बहुविध प्रशिक्षण केंद्र, बीड-२, धुळे-१, नांदेड-१ व रत्नागिरी-१ जिल्हयामध्ये उभारण्यात आलेले आहेत. अशा ठिकाणी सुध्दा प्रशिक्षण आयोजित करावे.

**९) सहभागी हमी पध्दती** :-

सहभागात्मक हमी पध्दती ही प्रतीची हमी देणारी स्थानिक पध्दतीला पोषक अशी सेंद्रिय उत्पादन हमी पध्दती आहे. या पध्दतीमध्ये उत्पादक आणि ग्राहकांबरोबरच भागीदारांच्या सहभागावर भर देण्यात आला आहे. ही पध्दती त्रयस्थ यंत्रणेमार्फत प्रमाणिकरणाच्या चौकटीबाहेर कार्य करते. यामध्ये उत्पादकाचे उत्पादन सहभागीदाराच्या सक्रिय सहभागातून प्रमाणित करण्यात येते. आणि हे विश्वासार्हतेच्या पायावर उभारलेले, सामाजिक जाळे आणि ज्ञानाच्या आदानप्रदानावर आधारलेले आहे. सहभागात्मक हमी पध्दती ही अशी पध्दती आहे की ज्यामध्ये एकाच परिस्थितीत लोक एकमेकांच्या उत्पादन पध्दतीचे मूल्यनिर्धारण तपासणी आणि पडताळणी करुन गटाचे संपूर्ण क्षेत्र सेंद्रिय म्हणून घोषित करतात.

- सेंद्रिय शेतक-याचे प्रमाणिकरण पध्दतीवर पूर्ण नियंत्रण
- प्रमाणिकरणासाठी सोपी व साधी पध्दती.
- अभिलेख प्रमाणशीर आणि शेतक-यांना समजतील अशा स्थानिक भाषेमध्ये उपलब्ध.
- गटातील शेतकरी हे स्थानिक व एकमेकांशी परिचित असतात. ते स्वतः शेती करीत असल्यामुळे ते शेतीच्या दैनंदिन व्यवहाराशी समरस राहतील.
- स्थानिक सुक्ष्म तपासणी पथक सेंद्रीय उत्पादन घेणा-या गटातील सहभागी शेतक-यांमधूनच निवडले जात असल्याने, व ते त्याच गावातील राहणारे असतात. त्यामुळे ते चांगले सर्वेक्षण करु शकतात.
- स्थानिक पथकाव्दारे उत्पादीत सेंद्रिय शेतीमालाची तपासणी करणेकामी कमी खर्च येतो.
- प्रादेशिक सहभागात्मक हमी पध्दती (पीजीएस) गट परस्परांना माहितीचे असल्याने प्रक्रिया आणि विक्रीसाठी चांगले जाळे उभारता येते.
- सहभाग हमी पध्दतीत वैयक्तिक शेतक-यांना प्रमाणिकरणाचे प्रमाणपत्र दिले जात असून त्यांची प्रमाणित सेंद्रिय उत्पादने स्वतंत्रपणे विकता येतात.

४.....

- रॅण्डम पध्दतीने सेंद्रिय उत्पादनाचे उत्पन्नातील अंश ठराविक कालावधीमध्ये तपासणी केली जात असल्याने उत्पादनाची विश्वासार्हता वाढते.

पी.जी.एस.प्रणालीपध्दतीचे प्रशिक्षण गटातील सदस्य व गट मार्गदर्शक यांना राज्य सरकारमार्फत, प्रादेशिक परिषदेमार्फत NCOF/ RCOF/ ICAR/ SAUS/ HTC/RCयांच्या वेगवेगळया सेंद्रिय शेतीमधल्या नामांकीत व तांत्रिकदृष्टया अभ्यासू व्यक्तीकडून सेंद्रिय शेती प्रमाणिकरण विषयावर प्रशिक्षण द्यावे तसेच, सदर प्रशिक्षणानंतर सबंधितांना प्रमाणपत्र देण्यात यावे. सदर प्रशिक्षणामध्ये शेतक-यांची नाव नोंदणी, सेंद्रिय उत्पादन व प्रमाणिकरणासाठी आवश्यक कागदपत्रे विविध बैठका, प्रशिक्षणे, शेती दैनंदिनी इ.रेकार्ड ठेवणे, पीजीएस प्रणाली पध्दतीने गट चालविणे, आवश्यक व्यवस्थापन करणे, घरच्या घरी किटकनाशके, खते निर्मिती करणे, माती नमुने गोळा करणे व गुणवत्ता नियंत्रण, सेंद्रिय पदार्थाचे पॅकेजींग, लेबलींग, ब्रँडींग व मार्केटींग करणे यासंदर्भात माहिती देणे, सेंद्रिय किटकनाशके, खते निर्मितीसाठी आवश्यक साधनसामुग्री इत्यादी विषयांचा समावेश असावा. सहभागी हमी पध्दतीमध्ये राष्ट्रीय जैविक शेती केंद्राने (NCOF) नोंदणी केलेल्या प्रादेशिक परिषदेचा सहभाग राहील.

**१०) आत्मा यंत्रणेने करावयाची अंमलबजावणी :-**

१०.१ खाजगी संस्थेची /कार्यान्वयन यंत्रणेची कार्यक्रमासाठी निवड करणे. सेंद्रिय शेती पध्दतीमध्ये अनुभव असलेल्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था/ कार्यान्वयन यंत्रणेची निवड करुन त्यांचेमार्फत कार्यक्रम राबविण्यात यावा.

१०.२ आत्मा यंत्रणेने NCOF / RCOF / ICAR / SAUS / FPC / HTC / RC यांच्याशी निगडीत सेंद्रिय शेतीमधल्या नामांकित व तांत्रिकदृष्टया अभ्यासू व्यक्तीकडून सेंद्रिय शेती प्रमाणिकरण विषयावर जिल्हास्तरावर गट मार्गदर्शकाचे प्रशिक्षण तसेच गटातील इतर शेतक-यांसाठी प्रशिक्षण आयोजीत करावे.

१०.३ ऑनलाईन नोंदणी- शेतकरी गटाची ऑनलाईन पध्दतीने संपूर्ण नोंदणी करावी.

१०.४ पी.जी.एस.प्रणालीसाठी आवश्यक कागदपत्रे तयार करणे(उदा.शेती पीक पध्दती,वापरलेल्या खतांचा व औषधांचा तपशिल, शेतकरी नोंदणी अर्ज, करार, सभा, प्रशिक्षण इत्यादी)

१०.५ अंतर्गत तपासणी (Peer Appraisal ) करणे व प्रमाणिकरण करणे.

१०.६ एका गटामधून (Cluster) प्रति वर्षे २१ माती नमुने घेणे. असे ६३ माती नमुने तीन वर्षामध्ये तपासणीसाठी पाठविणे.

१०.७ एका गटामधून (Cluster) सेंद्रिय उत्पादनाचे/सेंद्रिय मालाचे दुस-या व तिस-या वर्षात प्रत्येकी आठ नमुने किटकनाशके व रासायनिक अंश तपासणीसाठी NABL Accredited शासकीयप्रयोगशाळेत पाठवावे.

**११) कार्यक्रम राबवितांना खालील बाबींचा प्राधान्याने अंगिकार करावा.**

११.१ सेंद्रिय पध्दतीने नत्र स्थिरीकरण करणारी पीक लागवड.

११.२ सेंद्रिय प्रमाणीत द्रवरुपी सेंद्रीय खते खरेदी करणे. (नत्र स्थिरीकरण करणारे घटक, स्फुरद विरघळणारे जिवाणू खते, पालाश विरघळणारे जीवाणू, सेंद्रिय प्रमाणीत निम/करंजयुक्त किटकनाशके, निंबोळी अर्क, पावडर, शासनमान्य ग्रेडचे सेंद्रिय प्रमाणीत सूक्ष्म मूलद्रव्य इत्यादी खते खरेदी करणे व गटांना पुरवठा करणे)

११.३ फॉस्फेटयुक्त सेंद्रिय खताचा वापर करणे.

११.४ गांडूळ खत युनिट उभारणी करणे. त्याचे आकारमान ७x३x१ फूट असावे.

११.५ अवजारे भाडयाने घेऊन आवश्यकतेनुसार शेतक-यांना अवजारे / यंत्र पुरविणे.

११.६ सेंद्रिय उत्पादक गटांस सेंद्रिय उत्पादनाचे दळणवळण करण्यासाठी वाहन खरेदी करणे. दूरवरील सेंद्रिय मालवाहतुकीकरीता आवश्यकतेनुसार समूह/गटांनी आपापसांत सामंजस्य करार करुन/ गटांचा/समूह करुन कार्यवाही केल्यास (ऑनप्रोराटाबेसीस)अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. परंतु वाहतूक नियंत्रण विभाग यांचेकडून रितसर मान्यता घेणे आणि वाहनास योजनेचे अर्थसहाय्याचा फलक लावणे बंधनकारक राहील.

११.७ सेंद्रिय उत्पादनाचे पॅकींग, लेबेलिंग आणि ब्रँडींग तयार करणे.

**१२) पी.जी.एस.प्रणालीमध्ये प्रादेशिक परिषद निवड-**

सदर योजनेमध्ये प्रादेशिक परिषदेची मुख्य भूमिका राहणार आहे. प्रादेशिक सेंद्रिय शेती केंद्र नागपूर (RCOF) यांचेकडे नोंदणी केलेल्या प्रादेशिक परिषदेची निवड करुन त्याप्रमाणे त्यांचेकडे शेतकरी गटाची नोंदणी करावयाची आहे. आत्मा यंत्रणा स्वतः कार्यक्रम राबवणार असल्यास त्यांनी देखील प्रादेशिक सेंद्रिय शेती केंद्र नागपूर (RCOF) यांचेकडे प्रादेशिक परीषद म्हणून नोंदणी करावी.

उत्पादीत शेतीमालाचा दर्जा सुधारणे, सेंद्रिय शेती माध्यमातून व्यावसायिक सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे, आर्थिक उत्पन्न/रास्त दर-सेंद्रिय शेतीची बाजारपेठ तयार होऊन शेतक-यांना योग्य भाव मिळणे ही देखील सेंद्रिय शेतीची आणि परंपरागत कृषि विकास योजनेची प्रमुख उदिष्ट असलेमुळे उपलब्ध तरतूदीच्या अधिन राहून तृतीय पक्ष (थर्ड पार्टी) प्रमाणिकरण प्रक्रिया पूर्ण करून काही गट सेंद्रिय माल निर्यात करून लाभार्थ्यांना अधिक फायदा मिळवून देण्यास इच्छुक असल्यास तशी कार्यवाही करणेबाबत देखील मान्यता देणेत येत आहे. त्यायोगे परकीय चलन उपलब्ध होणार असून सेंद्रिय शेती करणा-या लाभार्थ्यांचा आत्मविश्वास वाढणार आहे. तृतीय पक्ष (थर्ड पार्टी) प्रमाणिकरण करावयाचे झाल्यास अतिरीक्त लागणारा निधी गटाने लोकसहभागातून भागवावा.

५० एकर क्षेत्रासाठी ५० शेतक-यांच्या गटासाठी वर्षनिहाय राबविण्यात येणारे घटक व बाबी **जोडपत्र-‘अ’** मध्ये देण्यात आलेल्या आहेत. **जोडपत्र-‘अ’ नुसार बाबी राबविण्याची जबाबदारी आत्मा यंत्रणेची राहील.**

**१३) अनुदानाचे वितरणः-**

कृषि आयुक्तालय स्तरावरुन जिल्हानिहाय अनुदानाचे वितरण हे जिल्हा प्रकल्प संचालक, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्याकडे कामाच्या स्वरुपानुसार/आवश्यकतेनुसार व प्राप्त निधीप्रमाणे शासन निर्णय क्रमांक पीएफएम-२०१७/प्र.क्र.४५/१७/२ ए, मुंबई दिनांक २७/०९/२०१७ व क्रमांक पीएफएम-२०१७/प्र.क्र.४५/१७/भाग-१/२ ए, मुंबई दिनांक ०९/११/२०१७ नुसार पीएफएमएस प्रणालीद्वारा सुपूर्त करण्यात येईल. संबधित विभागीय कृषि सहसंचालक यांनी वेळोवेळी योजनेचा आढावा घ्यावा. विभागातील सेंद्रिय गट संख्या बदलाचे अधिकार विभागीय कृषि सहसंचालक यांना राहतील.

**१४) शासकीय स्तरावरुन योजनेचे नियोजन, आंहरण व संवितरणः-**

राज्यात सन २०१५-१६ पासून राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गंत परंपरागत कृषि विकास योजना (सेंद्रिय शेती) **यशस्वी करण्यासाठी तालुका स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत** करण्यात येत असून सभा आयोजित करणे अभिप्रेत आहे. गरजेनुरूप अतिरिक्त सभा आयोजित करणेस हरकत नाही.

**१४.१ तालुका स्तरावरील समिती**

| | |
|---|---|
| १. तालुका कृषि अधिकारी | - अध्यक्ष |
| २. मंडल कृषि अधिकारी (सबंधित) | - सदस्य |
| ३. कृषि अधिकारी, पंचायत समिती | - सदस्य |
| ४. कृषि पर्यवेक्षक (संबधित ) | - सदस्य |
| ५. पणन प्रतिनिधी (कृषि उत्पन्न बाजार समिती) | - सदस्य |
| ६. तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक(तालुका कृषि अधिकारी कार्यालय) | - सदस्य सचिव |

**१४.१.१ तालुका स्तरावरील समितीचे कार्य व जबाबदा-याः-**

१. योजनेची तालुक्यात योग्य ती प्रचार व प्रसिद्धी करणे.
२. शेतक-यांची निवड व गटाची निवड करणे.
३. गटामधील गट मार्गदर्शकाची निवड प्रक्रिया हाताळणे.
४. गटाची निवड करुन जिल्हास्तरीय समितीकडे अंति मंजुरीसाठी सादर करणे.
५. जिल्हास्तरीय समितीच्या मंजुरीनंतर गटाची नोंदणी सहभागी हमीपद्धतीच्या वेबसाईटवर होईल याची दक्षता घेणे.
६. गटाला देण्यात येणा-या लाभाच्या बाबींचा आढावा घेणे व त्याची अंमलबजावणी योग्य रितीने होईल याची दक्षता घेणे.

सदर योजनेचे संपूर्ण संनियंत्रणाचे कामासाठी **जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे समिती** गठीत करण्यात येत आहे. सदर समितीने सेंद्रिय शेतीसाठी गाव निवड व कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यासाठी सभा आयोजित करणे अभिप्रेत आहे. गरजेनुरूप अतिरिक्त सभा आयोजित करणेस हरकत नाही.

**१४.२ जिल्हा स्तरावरील समिती**

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | -अध्यक्ष |
| २. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - सदस्य |
| ३. कृषि विद्यापीठ प्रतिनिधी | - सदस्य |
| ४. पणन प्रतिनिधी (कृषि उत्पन्न बाजार समिती) | - सदस्य |
| ५. प्रादेशिक परिषद - सेंद्रीय शेती प्रमाणिकरण संस्था (संबधित जिल्हा) (आवश्यकतेनुसार निमंत्रित) | - सदस्य |
| ६. प्रकल्प संचालक, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) | - सदस्य सचिव |

**१४.२.१. जिल्हा स्तरावरील समितीचे कार्य व जबाबदा-याः-**

१. तालुकास्तरीय समितीकडून प्राप्त गटांची अंतिम मंजुरी करणे.
२. आत्मा व्यतिरिक्त इतर संस्थांना कार्यक्रम राबविण्यास प्रस्तावानुसार मंजुरी देणे.
३. कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

७.....

**१५) प्रसिध्दी :-**

परंपरागत कृषि विकास योजनेंतर्गत सेंद्रिय शेती योजनेस व योजनेअंतर्गत घटकांना विस्तृत स्वरुपात जिल्हा व विभाग स्तरावरुन प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच, शेतक-यांना गटनिहाय सेंद्रिय शेती पध्दती अवलंबनासाठी उद्युक्त करावे. योजनेअंतर्गत राबविलेले कार्यक्रम परिसरातील शेतक-यांना व जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना दाखवावेत आणि अधिकाधिक शेतक-यांनी तंत्रज्ञान अवलंब करण्यासाठी वातावरण निर्मिती करावी. त्याचप्रमाणे शेतक-यांनी सेंद्रिय शेती करतांना राबविलेल्या उपक्रमांची, सेंद्रिय उत्पादनाची तथा शेतक-यांना मिळालेले वाढीव दर व अधिक उत्पन्नाबाबत यशोगाथा इंग्रजी व मराठी भाषेमध्ये तयार करुन त्यास विस्तृत प्रसिध्दी द्यावी. यासाठी सेंद्रिय शेतीस तांत्रिक मार्गदर्शन पुरविणा-या मार्गदर्शक संस्था तथा सेवाभावी कार्यकर्त्यांचे सहाय्य घ्यावे. विविध योजनांतर्गत सेंदिय शेतीशी संलग्न असणा-या घटकांची या योजनेशी सांगड घालून राज्यातील सेंद्रीय शेतीस चालना मिळणेसाठी प्रयत्न करावेत.

**१६) तपासणी:-**

योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या प्रत्येक क्षेत्रिय घटकांची खाली नेमून दिलेल्या मापदंडानुसार तपासणी करावी.

| अ.क्र. | संबंधित अधिकारी | तपासणीची % |
|---|---|---|
| १ | कृषि सहाय्यक | १०० टक्के |
| २ | कृषि पर्यवेक्षक | २५ टक्के |
| ३ | मंडळ कृषि अधिकारी | २५ टक्के |
| ४ | तालुका कृषि अधिकारी | १० टक्के |
| ५ | उपविभागीय कृषि अधिकारी | ०३ टक्के |
| ६ | प्रकल्प उपसंचालक (आत्मा) | ०१ टक्के |
| ७ | जिल्हा प्रकल्प संचालक (आत्मा) | ०२ टक्के |
| ८ | विभागीय कृषि सहसंचालक/ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | ०.१ टक्के |

तपासणीमध्ये आढळणा-या उणीवा व त्रुटी संबंधितांचे निदर्शनास आणून वेळीच पूर्तता करावी आणि त्याप्रमाणे सुधारणा कराव्यात. तसेच शेतकरी /कर्मचा-यांच्या शंका/अडचणींचे निरसन करणे यासाठी गरजेनुसार वरिष्ठ कार्यालय, कृषि विद्यापीठे तथा कृषि आयुक्तालयाचे स्तरावरुन मार्गदर्शन प्राप्त करुन घ्यावे. तसेच आढळलेल्या गंभीर बाबींबाबत नियमानुसार कार्यवाही करावी.

**१७) माहिती उपलब्धता व अहवाल सादर करणे :-**

सेंद्रिय शेती सहभागी हमी पध्दती ही नवीन कृषि पध्दती असल्याने विविध प्रकाराच्या माहितीची विविध स्तरावरुन विचारणा होते. त्यासाठी माहितीची उपलब्धता होणेसाठी सविस्तर माहिती जसे सेंद्रिय शेतीखालील पीकनिहाय क्षेत्र, उत्पादन, (शेतकरी नोंदणी, शेतीचा इतिहास, पीक पध्दती, वापरलेल्या निविष्ठा, शेतकरी प्रतिज्ञापत्र, सभा, प्रशिक्षण), कार्यरत असलेल्या संस्था, त्यांच्या कार्याचे स्वरुप, सेंद्रिय शेतीशी समरस झालेले शेतकरी/व्यक्ति त्यांचे योगदान, प्रमाणिकरणाखालील व प्रक्रियेतील क्षेत्र, सेंद्रिय शेतीचे ग्राहक, प्रक्रिया उद्योग, उपलब्ध बाजारपेठ, इ. सविस्तर माहिती गट प्रवर्तक (LRP) यांच्या मदतीने तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (BTM ) यांनी तालुका स्तरावरऑनलाईन पध्दतीने भरावी व वेळचेवेळी अद्यावत ठेवावी.

८.....

तसेच जिल्हा स्तरावर प्रकल्प उपसंचालक (आत्मा) यांनी डाटा एंट्री ऑपरेटर यांच्या मदतीने ऑनलाईन पध्दतीने शेतकरी नोंदणी, शेतीचा इतिहास, पीक पध्दती, वापरलेल्या निविष्ठा, शेतकरी प्रतिज्ञापत्र, सभा, प्रशिक्षण, आणि इतर अनुषंगिक संदर्भ माहिती वेळचेवेळी अद्यावत ठेवावी.

तालुका कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी शेतकरी याद्या प्रमाणित करुन त्यांचे कार्यालयात जतन करावी. तसेच मागणीनुसार तपासणीसाठी/ माहितीसाठी उपलब्ध करुन द्यावी. योजनेचा महिनानिहाय/ घटकनिहाय भौतिक/आर्थिक लक्ष /साध्याचा अहवाल दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**१८) योजना अंमलबजावणी करीता पुढील वेगवेगळया स्तरावर करावयाची जबाबदारी पुढील प्रमाणे -**

**१८.१.प्रकल्प संचालक आत्मा :-**

- योजनेतर्गत निवडलेल्या प्रकल्पासाठी स्वयंसेवी संस्था/ कार्यान्वयन यंत्रणेची निवड करणे (जिल्हा स्तरीय समितीच्या मान्यतेने). प्रकल्प संचालक आत्मा स्वतंत्ररित्या हे सुध्दा प्रकल्प राबवू शकतात.
- प्रकल्पातील अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यावर संनियंत्रण करणे, गरजेनुसार मार्गदर्शन व सूचना करणे, व अपेक्षित उदिष्ट पूर्ण होण्याचे दृष्टीने सर्व कार्यक्रम राबविणे.
- निवडलेल्या संस्थांना अग्रिम देणे. दिलेल्या अग्रिमाचा विनियोग घेतल्यानंतर पुढील अर्थसहाय्य देणे व दरमहा घटकनिहाय संभावित अहवाल उद्दिष्टपूर्तीच्या टक्केवारीसह सादर करणे इ. जबाबदा-या असतील.
- निवडलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या कार्यक्षेत्रासाठी आत्मातर्फे एका अधिका-याची जबाबदारी देऊन पुर्नविलोकन करणे.

**१८.२. विभागीय परिषद :-**

- निवडलेल्या प्रकल्पातील सर्व शेतक-यांना पीजीएस सहभाग हमी पद्वतीने प्रमाणीकरणासाठी मार्गदर्शन करणे व सहभागी करुन घेणे.
- प्रमाणिकरणाचे आवश्यक अभिलेख करुन घेणे व संगणकीकरण करणे. वेळोवेळी स्वयंसेवी संस्थांना मार्गदर्शनकरणे.
- विभागात निवडण्यात आलेल्या सर्व प्रकल्पाचे विभागीय परिषदेमार्फत मार्गदर्शन करण्यात यावे. ज्यामध्ये प्रकल्प अंमलबजावणी आवश्यकतेनुसार प्रमाणिकरण व क्षेत्रीय कामाकरीता मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे.

**१८.३. कार्यान्वयन संस्था:-**

- प्रकल्प अंमलबजावणीसाठी स्वयंसेवी संस्थेकडे उत्पादन ते विक्री व्यवस्था असणे आवश्यक आहे.
- प्रमाणिकरण प्रक्रियेतील एक अंतिम प्रमाणित गटांचे शेतमाल विक्रीची व्यवस्था सुसंगत होऊ शकेल अशा संस्थांची /गटांची निवड करणे
- निवड केल्यानंतर प्रकल्प संचालकास सादर करुन अनुमती घ्यावी. दर महिन्यात करावयाच्या कार्याचे पुर्व नियोजन मंजूर करुन घ्यावे म्हणजे त्रुटी राहणार नाहीत.

९....

- गटांचे प्रशिक्षण, क्षेत्रीय काम याबाबत फोटोग्राफ्स, लघुटिपणी, यशोगाथा याबाबतच्या नोंदी ठेवाव्यात. निवडलेले गट शक्यतोवर संलग्न क्षेत्रातील घ्यावेत.
- मासिक नियोजन व अंमलबजावणी अहवाल सादर करुन दिलेल्या कालावधील प्रकल्प पुर्ण करावे. पुर्ण झालेल्या प्रकल्पाचा पुर्णत्वाचा पूर्ण अहवाल सादर करावा.

**१९) भौतिक व आर्थिक कार्यक्रमः-**

केंद्र शासनाने राज्यासाठी ५० एकराचे (२० हेक्टर) सन २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षाच्या कार्यक्रमाचे ९३२ गट मंजूर केलेले आहेत.

तसेच सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षाच्या नियोजित कार्यक्रमाचे ३२६ गट मंजूर केलेले असून जोडपत्र **'ब'** मध्ये जिल्हानिहाय भौतिक लक्षांक दर्शविण्यात आलेले आहे.

**जोडपत्र- 'अ' मध्ये** दिलेल्या घटक व बाबी ५० एकर गटासाठी आहेत. त्याप्रमाणे प्रत्येक गटावर खर्च करण्यात यावा. प्रत्येक गटासाठी येणा-या खर्चाची नोंद स्वतंत्र ठेवण्यात यावी. गटासाठी प्रथम वर्षाच्या बाबी राबविल्याशिवाय, दुस-या व तिस-या वर्षाच्या बाबी राबविता येणार नाहीत. **जोडपत्र-'अ' मध्ये दिलेल्या क्रमानेच बाबी राबविण्यात याव्यात.**

**२०) गट/समूह पध्दतीने सेंद्रीय शेती- फलश्रुतीः-**

२०.१. शेतीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढून जमिनीचा पोत सुधारणे त्याद्वारे मूलस्थानी वर्षाजल संवर्धन होईल

२०.२. उत्पादीत शेतीमालाचा दर्जा सुधारेल.

२०.३. शेतात लागणा-या मूलभुत निविष्ठांचे शेतक-यांनी स्वतः उत्पादन करणे व त्याद्वारे उत्पादन खर्चात कपात होणार आहे.

२०.४. समुह गट संघटनाची वृत्ती वृध्दींगत होऊन शेतमाल विक्री करतांना मोठा साठा उपलब्ध होईल, त्याद्वारे विक्री दर ठरवितांना निर्णय क्षमता वाढीस लागेल.

२०.५. समुह पध्दतीमुळे गावातील सामाजिक सलोखा निर्माण होईल.

२०.६. प्रकल्पाची फलश्रुती शेजारच्या गावांना/शेतक-यांना मार्गदर्शक ठरुन सेंद्रीय पध्दतीचा विस्तार होईल.

पी.जी.एस.प्रणाली संबंधीत ऑग्लभाषीय मार्गदर्शक सुचना व त्यानुषंगीक माहितीकरीता राष्ट्रीय जैविक शेती केंद्र, गाजियाबाद यांचेकडील संकेतस्थळ- http://ncof.dacnet.nic.in वर माहिती उपलब्ध होईल. तसेच ईमेल Email: nbdc@nic.in व दूरध्वनी क्रमांक ०१२०-२७६४९०६, २७६४९०१, २७६४२१२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच प्रादेशिक सेंद्रीय शेती केंद्र नागपूर यांचेकडील संकेतस्थळ:- biofmh10@nic.in-E mail - rcofnagpur@gmail.comवर माहिती उपलब्ध आहे.

१०.....

## जोडपत्र- 'अ'

## परंपरागत कृषि विकास योजना तीन वर्षासाठी राबविण्याचे प्रस्तावीत असून योजनेच्या एका गट/ समूहाच्या अनुदानाचे सविस्तर विस्तारीकरण खालीलप्रमाणे

| अ.क्र. | घटक / बाब | अंदाजित अनुदानीत रक्कम रुपये | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण |
| **१** | **समूह शेतीमार्फत पीजीएस प्रमाणिकरणाचा अवलंब करणे .......** | | | | |
| **१.१** | **शेतकरी गट निर्मिती ---** ५० एकर क्षेत्रावर पी.जी. एस.प्रणाली पध्दतीने गट तयार करण्यासाठी शेतकरी तयार करणे....... पी.जी.एस.प्रणाली पध्दतीने सेंद्रिय शेती विकसीत करण्यासाठी तीन वर्ष मदत केली जाईल, त्यामध्ये विविध सेंद्रिय निविष्ठा, शेतकरी प्रशिक्षण, बाजारपेठ व इतर संलग्नित बाबीचा समावेश असेल. | | | | |
| १.१.१ | पी.जी.एस.प्रणाली पध्दतीने सेंद्रिय शेतीचा गट तयार करण्यासाठी शेतकरी सभा व चर्चासत्र आयोजीत करणे (२०० रुपये प्रती शेतकरी) | १०००० | ० | ० | १०००० |
| | **तपशील -** मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग, प्रादेशिक परिषद अथवा मान्यताप्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत ५० एकर क्षेत्राची निवड करुन एक सेंद्रिय शेतीगट स्थापन करणे. निवड केलेली संस्था /शेतकरी उत्पादक कंपनी किंवा प्रकल्प संचालक आत्मा यांच्यापैकी ज्यांना गट निर्मितीचे काम देण्यात आले असेल त्यांना अनुदान देण्यात यावे. दिलेल्या अनुदानामध्ये शेतक-यांची सभा व चर्चासत्र आयोजन यासाठी आवश्यक खर्च, प्रमाणिकरणासाठी गट/शेतक-यांना द्यावयाचे रजिस्टर याचा खर्च, तज्ज्ञ मार्गदर्शक यांचे मानधन व गट निर्मिती करणा-या संस्थेस १० टक्के मानधन याप्रमाणे खर्च करावा. | | | | |
| १.१.२ | यशस्वी सेंद्रिय शेतीवर शेतक-याचा अभ्यास दौरा. (२०० रुपये प्रती शेतकरी) | १०००० | ० | ० | १०००० |
| | **तपशील -**मार्गदर्शक सुचनानुसार निवड केलेली संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी किंवा प्रकल्प संचालक आत्मा यांचेमार्फ़त चांगल्या प्रकारच्या प्रात्यक्षिक ज्ञानासाठी व माहितीसाठी यशस्वी सेंद्रिय शेतीवर गटाच्या सहलीचे आयोजन करुन त्यांचेमार्फत खर्च करण्यात यावा. दिलेले अनुदान प्रवासाचा खर्च, शेतक-यांचा नाष्टा-भोजन व ज्या तज्ज्ञ शेतक-यांकडे सहलीचे आयोजन केले आहे, त्यांचे मानधन या बाबीचा समावेश असावा. | | | | |
| १.१.४ | गट प्रशिक्षण/ गटातील शेतकरी सदस्यांना सेंद्रिय शेती प्रशिक्षण (तीन प्रशिक्षणे रु.२०,०००/- प्रति प्रशिक्षण) | ६०००० | ० | ० | ६०००० |
| | **तपशील-** मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग प्रादेशिक परिषद अथवा मान्यता प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत NCOF / RCOF/ ICAR / SAUS / RC / HTC यांच्या वेगवेगळया सेंद्रिय शेतीमधल्या नामांकित तसेच तांत्रिकदृष्टया अभ्यासू व्यक्तींकडून तीन प्रशिक्षण पहिल्या सहा महिन्यामध्ये घेणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाचा निकष हा खालीलप्रमाणे असावा.<br>**१. प्रथम प्रशिक्षण-**<br>(१.१) सेंद्रिय पध्दतीने रोपे वाढविणे, रोपवाटिकेमध्ये रोपे तयार करणे. (१.२) सेंद्रिय बी-बियाणे निर्मिती.<br>**२. व्दितीय प्रशिक्षण-** खत निर्मिती व व्यवस्थापन<br>(२.१) हिरवळीचे खत निर्मिती करणारी झाडांची लागवड करणे व त्यांच्या सहाय्याने शेताभोवती बंदिस्त बांध तयार करणे/आवश्यकतेनुसार बफर झोनमध्ये चर काढणे (२.२) खत व गांडूळ खत निर्मिती करणे व त्यांचा योग्य वापर करणे.<br>**३.तृतीय प्रशिक्षण-** सेंद्रिय औषधे व खत निर्मितीसाठी प्रशिक्षण.<br>(३.१) पंचगव्य,बिजामृत, जीवामृत इ. औषधे निर्मिती करणे व त्यांचा योग्य वापर करणे.<br>(३.२) सेंद्रिय खताचा वापर (बिज प्रक्रिया, ठिबक सिंचन, फवारणी, सेंद्रिय खताची व औषधाची हाताळणी व वापर हे विषय प्रामुख्याने समाविष्ट असावेत) आवश्यक आहे.<br>प्रकल्प संचालक आत्मा स्तरावरुन प्रति प्रशिक्षण १५००० रुपये अनुदान, हॉल भाडे, तज्ज्ञ व्यक्तीचे मानधन, चहा-भोजन, स्टेशनरी, प्रवास खर्च, आयोजक संस्थेचे १० टक्के मानधन व इतर अनुषंगीक सुविधा (उदा. टेबल, खुर्ची, साउंड इ.) या पध्दतीने खर्च करण्यात यावा. | | | | |
| **एकूण १.१** | | **८००००** | **०** | **०** | **८००००** |

| अ.क्र. | घटक / बाब | अंदाजित अनुदानीत रक्कम रुपये | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण |
| **१.२** | **सहभागी हमी पध्दतीने (पी.जी.एस.) प्रमाणिकरण** | | | | |
| १.२.१ | दोन दिवसाचे पी.जी.एस. प्रणाली पध्दतीने प्रमाणिकरण विषयावर प्रशिक्षण देणे रु.२००/- प्रती दिन/ (LRP) गट मार्गदर्शक | ४०० | ० | ० | ४०० |
| | **तपशील-** पी.जी.एस.प्रणाली पध्दतीने गट मार्गदर्शकाला (LRP) दोन दिवसीय सेंद्रिय शेती प्रमाणिकरण विषयावर खालील विषयावर जिल्हास्तरीय प्रशिक्षण देणे. (१) शेतक-याची नाव नोंदणी. (२) सेंद्रिय उत्पादन व प्रमाणिकरणा साठी आवश्यक कागदपत्रे. (३) विविध बैठकांची, प्रशिक्षण, शेती दैनंदिनी इ.रेकॉर्ड ठेवणे. (४) वार्षिक कृति आराखडा तयार करणे. (५) पी.जी.एस.प्रणाली पध्दतीने गट चालविणे, आवश्यक व्यवस्थापन करणे.<br>सदरचे प्रशिक्षण प्रकल्प संचालक आत्मा यांनी स्वतःच्या स्तरावर आयोजित करावे यासाठी RCOF अथवा इतर नामांकित RC मधील तज्ज्ञ व्यक्ती यांची मदत घ्यावी. प्रशिक्षणासाठी करावयाचा खर्च हॉल भाडे, निवास व्यवस्था, चहा-भोजन, स्टेशनरी व इतर अनुषंगीक सुविधा (उदा. टेबल, खुर्ची, साउंड इ.) या पध्दतीने खर्च करण्यात यावा. | | | | |
| १.२.२ | तीन दिवसांसाठी गट मार्गदर्शकाचे प्रशिक्षण रु.२५०/- प्रती दिन | ० | ७५० | ० | ७५० |
| | **तपशील-** मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग प्रादेशिक परिषद अथवा मान्यता प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत NCOF / RCOF/ ICAR / SAUS / RC / HTC यांच्या वेगवेगळया सेंद्रिय शेतीमधल्या नामांकित व तांत्रिक दृष्टया अभ्यासू व्यक्तींकडून गट मार्गदर्शकाचे LRP तीन दिवसीय प्रशिक्षण घेणे.<br>**प्रशिक्षणामध्ये पुढीलप्रमाणे विषय असावेत.**<br>(१) माती नमुने गोळा करणे व गुणवत्ता नियंत्रण (२) सेंद्रिय पदार्थाचे /उत्पादनाचे पॅकींग (Packaging), लेबलिंग आणि ब्रँडींग व मार्केट यासंदर्भात माहिती देणे, (३) सेंद्रिय किटकनाशके, खते निर्मितीसाठी आवश्यक मदत करणे<br>सदरचे प्रशिक्षण प्रकल्प संचालक आत्मा यांनी स्वतःच्या स्तरावर आयोजित करावे यासाठी RCOF अथवा इतर नामांकित RC मधील तज्ज्ञ व्यक्ती यांची मदत घ्यावी. प्रशिक्षणासाठी करावयाचा खर्च हॉल भाडे, निवास व्यवस्था, चहा-भोजन, स्टेशनरी व इतर अनुषंगीक सुविधा (उदा. टेबल, खुर्ची, साउंड इ. या पद्ध्तीने खर्च करण्यात यावा. | | | | |
| १.२.३ | ऑनलाईन नोंदणी...... (५० शेतक-यांच्या समूहासाठी ) १०० रुपये प्रती शेतकरी | ० | ५००० | ५००० | १०००० |
| | **तपशील-** मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग, प्रादेशिक परिषद अथवा मान्यता प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत पीजीएस प्रणालीच्या वेबसाईवर online पध्दतीने शेतकरी नोंदणी, शेतीचा इतिहास, पीक पध्दती, वापरलेल्या खतांचा व औषधांचा तपशिल, शेतकरी प्रतिज्ञा, सभा, प्रशिक्षण आणि इतर संदर्भ माहिती भरणे, प्रत्येक गटासाठी नेमलेला ऑपरेटर आणि सल्लागार यासाठी जबाबदार असेल.<br>गटाची नोंदणी स्वतः गट करत असल्यास त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे अथवा डेटा एंट्री ऑपरेटर / गट सल्लागार यांनी केल्यास त्यांना प्रति शेतकरी रु.१००/- असे मानधन द्यावे. तसेच ATM / BTM यांनी नोंदणी केल्यास त्यांच्या नावे अथवा आत्मा संस्थेस देखील मानधन देण्यास हरकत नाही. | | | | |
| १.२.४ | माती नमुने गोळा करणे व तपासणी करणे. (२१ नमुने प्रती वर्ष/प्रती गट ) रु.१९० प्रती नमुना याप्रमाणे तीन वर्षासाठी) | ३९९० | ३९९० | ३९९० | ११९७० |
| | **तपशील-** मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग प्रादेशिक परिषद अथवा मान्यता प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत वेगवेगळया कृषि किंवा फलोत्पादन पिकांचे माती नमुने शास्त्रीय पध्दतीने गोळा करणे, त्या नमुन्यांची चाचणी करणे, ही चाचणी मान्यताप्राप्त राज्य किंवा देशपातळीवरील कृषि विभागाच्या ICAR / NABL च्या प्रयोगशाळेकडून केलेली असावी. हया सर्व बाबीसाठी प्रादेशिक परिषदेमार्फत ठरवून दिलेला LRP (गट मार्गदर्शक) जबाबदार असेल.<br>GPS उपकरणाचा वापर करुन प्रत्येक गटाने मृद नमुने कृषि सहाय्यकाच्या मदतीने घेऊन ते मृद विश्लेषणासाठी जिल्हा शासकीय मृद चाचणी प्रयोग शाळेकडे पाठविण्यात यावे. त्यासाठी येणारा खर्च प्रति नमुना १९० रुपये प्रमाणे प्रकल्प संचालक आत्मा यांनी जिल्हा शासकीय मृद चाचणी प्रयोग शाळेस अदा करावेत व चाचणी नंतर प्राप्त होणा-या जमिन आरोग्य पत्रिका संबधीत गटातील शेतक-यांना वाटप करुन योग्य ते मार्गदर्शन करण्याची जबाबदारी प्रकल्प संचालक आत्मा यंत्रणेची राहील. | | | | |

| अ.क्र. | घटक / बाब | अंदाजित अनुदानीत रक्कम रुपये | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण |
| १.२.५ | पी.जी.एस.प्रणाली -साठी आवश्यक कागदपत्रे तयार करणे शेतीचा इतिहास, पीक पध्दती, वापरलेल्या खतांचा व औषधांचा तपशिल, शेतकरी नोंदणी अर्ज, करार,सभा, प्रशिक्षण इत्यादी बाबींची कागदपत्रे तयार करणे. (१०० रु. प्रति शेतकरी ) | ५००० | ५००० | ५००० | १५००० |
| | **तपशील-** मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग प्रादेशिक परिषद अथवा मान्यता प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत निवडलेल्या पीजीएस प्रणालीच्या online data एंट्री करणा-या ऑपरेटर व सल्लागार यांनी सर्व काम करणे, प्रत्येक पिकानुसार त्या पिकाची पिक उत्पादन पध्दत व इतर कागदपत्रे तयार करणेकरीता.<br>PGS प्रणालीच्या Website वर online पध्दतीने शेतकरी गटाची नोंदणी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे तयार करणे शेतीचा इतिहास, पीक पध्दती, वापरलेल्या खतांचा व औषधांचा तपशिल, शेतकरी नोंदणी अर्ज, करार, सभा, प्रशिक्षण इ. बाबींची कागदपत्रे तयार करणे. या बाबतची माहिती स्वतः गट संकलीत करु शकत असल्यास त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे अथवा डाटा एन्ट्री ऑपरेटर/गटासाठी नेमलेला सल्लागार यांनी केल्यास त्यांना प्रति शेतकरी १०० रुपये असे मानधन द्यावे, प्रकल्प संचालक आत्मा यांचे BTM/ATM यांनी नोंदणी केल्यास त्यांच्या नावे अथवा आत्मा संस्थेस देखील मानधन देण्यास हरकत नाही. | | | | |
| १.२.६ | शेतक-यांच्या शेताची गट मार्गदर्शकामार्फत तपासणी करणे. (रुपये ४००/- प्रती तपासणी ) (वर्षात तीन तपासणी याप्रमाणे) | १२०० | १२०० | १२०० | ३६०० |
| | **तपशील-** मानकानुसार शेताचे निरीक्षण करणे, शेतीचे संपूर्ण रेकॉर्ड, शेतकरी दैनंदिनी, शेतीचा नकाशा, लागवड दिनांक, वापरलेल्या खतांचा व औषधांचा तपशिल इ. बाबींचा समावेश असावा.<br>हया सर्व बाबींसाठी मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग प्रादेशिक परिषद अथवा मान्यताप्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत ठरवून दिलेला LRP (गट मार्गदर्शक ) जबाबदार असेल. सदरची तपासणी गट मार्गदर्शकाने करावयाची आहे. तपासणीचा नमुना देण्याची जबाबदारी RC यांची असेल व गट मार्गदर्शकाने तपासणी अहवालाची १ प्रत गटाच्या सभेमध्ये ठेवण्यात यावी व १ प्रत गटाने निवड केलेल्या प्रादेशिक परिषदेकडे देण्यात यावी, प्रादेशिक परिषदेने संबधीत तपासणीची खातरजमा करुन गट मार्गदर्शकाला तपासणीची रक्कम अदा करणेबाबत प्रकल्प संचालक आत्मा यांचेकडे शिफारस करावी. त्याप्रमाणे प्रकल्प संचालक,आत्मा यांनी सदर रक्कम धनाकर्षाव्दारे अदा करावी. प्रत्येक वर्षामध्ये गट मार्गदर्शकाने RC ने ठरवून दिलेल्या कालावधीनुसार एकूण ३ तपासण्या कराव्यात. | | | | |
| १.२.७ | NABL च्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडून शेती मालाचे तपासणी करणे. (रु.१०,०००/ नमुन्यासाठी प्रती गट याप्रमाणे ८ नमुने प्रति वर्ष) | ० | ८०००० | ८०००० | १६०००० |
| | **तपशील-** गट प्रवर्तकाकडून NCOF/ RCOF / RC / HTC कडून पिकांचे नमुने शास्त्रीय पध्दतीने गोळा करणे, त्या नमुन्यांची चाचणी करणे याबाबत घेतलेल्या प्रशिक्षणाआधारे प्रत्येकी एका गटामधून (Cluster) सेंद्रिय उत्पादनाचे / सेंद्रिय मालाचे दुस-या व तिस-या वर्षात प्रत्येकी आठ नमुने किटकनाशके व रासायनिक अंश तपासणीसाठी NABL प्रयोगशाळेत पाठवावे, ही चाचणी शासकीय/ खाजगी NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून करावी. मात्र खाजगी प्रयोगशाळेत नमुने पाठवित असतांना शासन दरानेच अनुदान देय राहील. प्रकल्प संचालक, आत्मा यांनी संबंधित प्रयोगशाळेस डीबीटी द्वारे थेट अनुदान वर्ग करावे. | | | | |
| १.२.८ | प्रमाणिकरण फी | ० | २००० | ० | २००० |
| | **तपशील-** तपासणीच्या आधारे पीजीएस प्रणाली पध्दतीने प्रमाणिकरण करुन प्रमाणपत्र देणे. गटाची नोंदणी ज्या प्रादेशिक परिषदेक्डे (RC) करण्यात आलेली आहे त्यामार्फत प्रमाणिकरण व प्रमाणिकरण पत्र याचा खर्च भागविण्या साठी सदरचे अनुदान देण्यात यावे. | | | | |

| अ.क्र. | घटक / बाब | अंदाजित अनुदानीत रक्कम रुपये | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण |
| १.२.९ | प्रमाणिकरण कार्यालय खर्च | २६१५० | १६९०० | १६९०० | ५९९५० |
| | **तपशील-** गटाच्या प्रमाणिकरणाच्या कामासाठी निवडलेल्या विभागीय परिषद कार्यालयाच्या खर्चासाठी सदरची रक्कम द्यावयाची आहे. यामध्ये कार्यालयाचे भाडे, कामगारांचे वेतन, सल्लागार शुल्क, डेटा एंट्री ऑपरेटर खर्च, कार्यालय फर्निचर, संगणक, प्रिंटर, लेखनसामुग्री खर्च इत्यादी बाबींचा समावेश आहे. | | | | |
| **एकूण १.२** | | **३६७४०** | **११४८४०** | **११२०९०** | **२६३६७०** |
| **२** | **सेंद्रिय गट संकल्पना** | | | | |
| **२.१** | **एका गटासाठी/समूहासाठी कृति आराखडा** | | | | |
| २.१.१ | साधारण शेतीचे सेंद्रिय शेतीमध्ये रुपांतर करणे. रु.१०००/- प्रति एकर / ५० एकर क्षेत्रासाठी | ५०००० | ५०००० | ५०००० | १५०००० |
| | **तपशील -** मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग प्रादेशिक परिषद अथवा मान्यता प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत साधारण शेतीचे सेंद्रिय शेतीमध्ये रुपांतर करण्यासाठी विविध बाबींचा अभ्यास करुन एक अंमलबजावणी धोरण आखले जावे. त्यामध्ये माती परिक्षण अहवाल, पिक पध्दती, जमिनीचा चढउतार, पाण्याचे स्रोत, बी-बियाणे उपलब्धता,बांबू /कोकम, गिरीपुष्प अथवा ठिकठिकाणच्या स्थानिक गरजा आणि उपलब्धतेनुसार बंदिस्तबांध- बफरझोनमध्ये लागण होऊ नये यास्तव बॉर्डरक्रॉप, जमिनीभोवती खोल चर, खड्डा, इत्यादी समावेश असावा. तसेच जमीनीतील सेंद्रियकर्ब वाढविण्यासाठी शेतक-यांकडे उपलब्ध असलेल्या शेणखताचे तसेच शेतातील पिक अवशेषांचे बीडी कंपोस्ट करुन त्याचे वापराचा प्राधान्याने समावेश करावा.<br>अनुदानाची रक्कम थेट लाभार्थीचे नावे डीबीटी प्रणालीव्दारे अदा करण्यात यावी. शेतक-याने मार्गदर्शक सुचनेनुसार केलेल्या कामाचा अहवाल गट प्रवर्तकाच्या व संबधित शेतक-यांच्या स्वाक्षरीने संबधित कृषि सहाय्यकाकडे देण्यात यावा. कृषि सहाय्यकाने केलेल्या कामाची १०० टक्के तपासणी करुन अनुदान अदागायीसाठी शिफारस करावी. तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक गटातील शिफारस प्राप्त शेतक-यांचे अहवाल संकलितकरुन प्रकल्प संचालक, आत्मा यांचेकडे अनुदान अदायगीसाठी पाठवावेत व संबधित कृषि पर्यवेक्षक, मं.कृ.अ. व ताकृअ यांना त्यांच्या नेमुन दिलेल्या तपासणीसाठी यादीची प्रत पाठवावी. कृषि पर्यवेक्षक, मं.कृ.अ. व ताकृअ यांना दिलेल्या टक्केवारीप्रमाणे तपासणी करावी व काही आक्षेप असल्यास ८ दिवसाचे आत प्र.सं.,आत्मा यांना कळवावे. | | | | |
| २.१.२ | सेंद्रिय बी-बियाणे खरेदी, सेंद्रिय बीज रोपवाटिका उभारणी करणे.... (रु.५००/- प्रती एकर/प्रती वर्ष/५० एकर क्षेत्रासाठी.) | २५००० | २५००० | २५००० | ७५००० |
| | **तपशील -** सेंद्रिय बि-बियाणे खरेदी, सेंद्रिय बीज रोपवाटिका तयार करण्यासाठी सहाय्य. यामध्ये सेंद्रिय बिज खरेदी करणे,जमीन तयार करणे व त्यासाठी लागणारी मजुरी असा येणारा खर्च शेतक-यास देय आहे याबाबत केलेल्या कामाची खात्री कृषि सहाय्यक, एच्र , गट प्रवर्तक यांनी खात्री करुन अनुदान प्राप्तीसाठी प्रकल्प संचालक, आत्मा यांना शिफारस करुन अनुदानाची रक्कम थेट लाभार्थीचे नावे डीबीटी प्रणालीव्दारे अदा करण्यात यावी. | | | | |
| २.१.३ | पारंपारिक पध्दतीने सेंद्रिय निविष्ठा निर्मिती करणे. बिजामृत, जीवामृत, बायोडायनामीक, सी.पी.पी. कम्पोस्ट इ.औषधे निर्मिती करणे. ( रु.१५००/- प्रती युनिट/प्रति एकर/ ५० एकर क्षेत्रासाठी ) | ७५००० | ० | ० | ७५००० |
| | **तपशील -** मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग प्रादेशिक परिषद अथवा मान्यता प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत पारंपारीक पध्दतीने सेंद्रिय औषधे व खत निर्मिती करणे पंचगव्य बिजामृत जीवामृत बायोडायनॅमिक तरल खत, सी.पी.पी तयार करणे इ. औषधे निर्मिती करण्यासाठी लागणारे ड्रम, स्वच्छता यंत्र, बाटल्या, गाळणी मशिने, सिलींग मशिने व इतर संदर्भीत बाबीसाठी मदत करणे. पारंपारीक पध्दतीने सेंद्रिय निविष्ठा निर्मिती करण्यासाठी सदरचे १५००/- प्रती युनिट अनुदान शेतक-यांने खाली निर्देशीत केलेल्या कामासाठी धनाकर्षाद्वारे थेट देण्यात यावे.<br>१) जीवामृत तयार करणे - शेतक-याकडे जीवामृत तयार करण्यासाठी त्याने स्वतः टाकी व तत्सम सामुग्री खरेदी करावी.<br>२) शेतक-याला त्याच्या शेतावर कंपोस्टींग करण्यासाठी नाडेपची उभारणी त्याने स्वतः करावयाची आहे.<br>३) बायोडायनामीक पध्दतीने खत तयार करण्यासाठी सीपीपी कल्चर व तत्सम सामुग्रीची खरेदी स्वतः मान्यताप्राप्त | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | संस्थेकडून करावी. यामध्ये मजूरीच्या खर्चाचा समावेश राहील.<br>उपरोक्त पध्दतीने शेतक-याने केलेल्या कामाची तपासणी कृषि सहाय्यक यांनी १०० टक्के करावी व अनुदानासाठी तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे विहीत मार्गाने सादर करावी. तालुका कृषि अधिकारी यांच्या शिफ़ारशी नुसार प्रकल्प संचालक, आत्मा यांनी संबधीत शेतक-यांना अनुदान वितरीत करावे. अनुदानाची रक्कम थेट लाभार्थीचे नावे डीबीटी प्रणालीव्दारे अदा करण्यात यावी. | | | | |
| २.१.४ | नत्र स्थिरीकरण करणारे पिक लागवड करणे.<br>(गिरी पुष्प, सिसबेनिया, इ.)<br>रु.२०००/- प्रती एकर/५० एकर क्षेत्रासाठी | ५०००० | २५००० | २५००० | १००००० |
| | **तपशील -** सेंद्रिय पध्दतीने नत्र स्थिरीकरण करणारे पिक लागवड करण्यासाठी लागणारे बी-बियाणे खरेदी करणे, जमीन मशागत करणे, मजूर इत्यादी बाबीसाठी मदत. यामध्ये गिरीपुष्प, सिसबेनिया, ताग, धैचा, गवार, मुग, चवळी इ.ची शेतक-यांनी स्वत; खरेदी करावी किंवा उपलब्धतेस अडचणी येत असल्यास प्र.सं.आत्मा यांनी महाबीज/राष्ट्रीय बीज निगम / कृषि विद्यापीठ इ. शासकीय यंत्रणेकडून शेतकरी/गटाच्या मागणीनुसार खरेदी करुन द्यावीत. व जमीन तयार करणे/मजुरीसाठीची उर्वरीत रक्कम शेतक-यास थेटअदा करावी. या पध्दतीने शेतक-याने केलेल्या कामाची १००टक्के तपासणी कृषि सहाय्यकाने करुन अनुदानासाठी ताकृअकडे विहीत मार्गाने सादर करावी. ता.कृ.अ.चे शिफारशीनुसार प्र.सं., आत्मा यांनी संबधित शेतक-यांना अनुदान वितरीत करावे. अनुदानाची रक्कम थेट लाभार्थी, महाबीज किंवा गटाचे नावे असलेल्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीव्दारे अदा करण्यात यावी. | | | | |
| २.१.५ | **Botanical extract** जैविक वनस्पती घटकापासून अर्क/ बायोडायनॅमिक तरल किडरोधक/ दशपर्णी पावडर निर्मिती युनिट उभारणे.<br>(निम केक व निम ऑईल) रु.१०००/प्रति युनिट/ प्रति एकरप्रमाणे ५० एकर क्षेत्रासाठी. | ५०००० | ० | ० | ५०००० |
| | **तपशील -** सेंद्रिय पध्दतीने Botanical extract (वनस्पती काढा) लागणारे बी-बियाणे खरेदी करणे, दळणी यंत्र, सफाई मजूर, ड्रम, स्वच्छता यंत्र, बाटल्या, गाळणी मशिने, सिलींग मशिने व इतर संदर्भिय बाबीसाठी खर्च करणे.<br>22 botanical extract जैविक वनस्पती घटकापासून अर्क/ बायोडायनॅमिक तरल किडरोधक/ दशपर्णी अर्क निर्मिती युनिट उभारणे, सेंद्रिय निम केक व निम ऑईल तयार करण्यासाठी बियाणे गोळा करणे व त्यासाठी लागणारे ड्रम, बॉटल, फिल्टर, स्प्रेअर या साहित्याचा येणारा खर्च शेतक-यास देय आहे. उपरोक्त पध्दतीने शेतक-याने केलेल्या कामाची तपासणी कृषि सहाय्यक यांनी १०० टक्के करावी व अनुदानासाठी तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे विहीत मार्गाने सादर करावी. तालुका कृषि अधिकारी यांच्या शिफ़ारशीनुसार प्रकल्प संचालक, आत्मा यांनी अनुदानाचीरक्कम थेट लाभार्थी, किंवा गटाचे नावे असलेल्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीव्दारे अदा करण्यात यावी. | | | | |
| **एकूण २.१** | | **२५००००** | **१०००००** | **१०००००** | **४५००००** |
| **२.२** | **एकात्मिक खत व्यवस्थापन (Integrated Manure Management)** | | | | |
| २.२.१ | सेंद्रिय प्रमाणित द्रवरुपी (LIQUID) सेंद्रिय खते खरेदी करणे नत्र स्थिरीकरण करणारे घटक, स्फुरद विरघळणारे खते, पालाश विरघळणारे जीवाणू खते खरेदी करणे, शासन मान्य ग्रेडची सेंद्रिय प्रमाणित सूक्ष्म मूलद्रव्ये आवश्यकतेनुसार रु. ५००/प्रती एकरप्रमाणे ५० एकर क्षेत्रासाठी | २५००० | ० | ० | २५००० |
| | **तपशील -** मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग प्रादेशिक परिषद अथवा मान्यता प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत सेंद्रिय प्रमाणित द्रवरुपी सेंद्रिय खते खरेदी करण्यासाठी तसेच खतांचा जमिनीमध्ये योग्य वापर करण्यासाठी प्रत्येक शेतक-याला मदत करुन पिक उत्पादन वाढविणे. मार्गदर्शक सुचनानुसार प्रकल्प संचालक, आत्मा यांनी सेंद्रिय प्रमाणित द्रवरुपी सेंद्रिय खते खरेदी करावीत व गट स्तरावर पुरवठा करावीत तसेच प्र.सं. आत्मा यांनी शासकीय प्रयोगशाळा / कृषि विज्ञान केंद्र येथून त्यांचे स्वत:चे उत्पादीत निविष्ठांची खरेदी केल्यास अनुदानाची रक्कम संबंधित प्रयोगशाळा / कृषि विज्ञान केंद्र यांना अदा करावी, गटाने बाहय स्रोताकडून खरेदी केली असल्यास डीबीटी प्रणालीव्दारे त्यांचे अधिकृतबँक खात्यावर अनुदान वर्ग करण्यात यावे. | | | | |

| अ.क्र. | घटक / बाब | अंदाजित अनुदानीत रक्कम रुपये | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण |
| २.२.२ | सेंद्रिय प्रमाणित द्रवरुपी (LIQUID), सेंद्रिय प्रमाणित निमयुक्त /करंजयुक्त बायोडायनामीक किडरोधक किटकनाशके, (Trichoderma viridae, Pseudomonas, fluorescens, Metarhizium, Beaviourie bassiana, Pacelomyces, verticilli)<br>रु. ५००/ प्रती एकर प्रमाणे ५० एकर क्षेत्रासाठी | ० | २५००० | ० | २५००० |
| | **तपशील -** मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग प्रादेशिक परिषद अथवा मान्यता प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत सेंद्रिय प्रमाणित द्रवरुपी सेंद्रिय किटकनाशके खरेदी करण्यासाठी तसेच त्या किटकनाशकांचा योग्य वापर करण्यासाठी प्रत्येक शेतक-याला मदत करुन पिक उत्पादन वाढविणे. मार्गदर्शक सुचनानुसार प्र. सं, आत्मा यांनी सेंद्रिय प्रमाणित द्रवरुपी सेंद्रिय किटकनाशके खरेदी करावी व गट स्तरावर पुरवठा करावीत. प्र.सं. आत्मा यांनी शासकीय प्रयोगशाळा / कृषि विज्ञान केंद्र येथून त्यांचे स्वतःचे उत्पादीत निविष्ठांची खरेदी केल्यास अनुदानाची रक्कम संबंधित प्रयोगशाळा / कृषि विज्ञान केंद्र यांना अदा करावी, गटाने बाहय स्रोताकडून खरेदी केली असल्यास डीबीटी प्रणालीव्दारे त्यांचे अधिकृत बँक खात्यावर अनुदान वर्ग करण्यात यावे. | | | | |
| २.२.३ | निंबोळी अर्के, निंबोळी केक.......<br>रु.५००/प्रती एकर प्रमाणे ५० एकर क्षेत्रासाठी | ० | २५००० | ० | २५००० |
| | **तपशील -** मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग प्रादेशिक परिषद अथवा मान्यता प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत निंबोळी अर्क, निंबोळी ते निंबोळी पावडर खरेदी करण्यासाठी तसेच त्या किटकनाशकांचा योग्य वापर करण्यासाठी प्रत्येक शेतक-याला मदत करुन किड व रोग नियंत्रण करणे. मार्गदर्शक सुचनानुसार प्रकल्प संचालक, आत्मा यांनी निंबोळी अर्क , निंबोळी केक खरेदी करावी व गट स्तरावर पुरवठा करावीत. गट/ लाभार्थ्याने खरेदी केलेल्या निविष्ठांचे पोटी अनुदानाची रक्कम त्यांचे अधिकृतबँक खात्यावर डीबीटी प्रणालीव्दारे अदा करण्यात यावी. | | | | |
| २.२.४ | फॉस्फेटयुक्त सेंद्रीय खत (खत नियंत्रण आदेश १९८५ च्या तरतूदीनुसार)<br>रु.१०००/ प्रती एकर प्रमाणे ५० एकर क्षेत्रासाठी. | ५०००० | ० | ० | ५०००० |
| | **तपशील -** खत नियंत्रण आदेश १९८५ च्या तरतूदीनुसार फॉस्फेटयुक्त सेंद्रिय खत खरेदी करण्यासाठी तसेच त्या खताचा योग्य वापर करण्यासाठी प्रत्येक शेतक-याला मदत करुन किड व रोग नियंत्रण करणे. खत नियंत्रण आदेश १९८५ च्या तरतूदीनुसार फॉस्फेटयुक्त सेंद्रिय खत खरेदी प्रकल्प संचालक, आत्मा यांनी खरेदी करावी. गट/लाभार्थ्याने खरेदी केलेल्या निविष्ठांच्या पोटी अनुदानाची रक्कम त्यांचे अधिकृत बँक खात्यावरडीबीटी प्रणालीव्दारे अदा करण्यात यावी, मात्र खरेदी केलेल्या निविष्ठा या खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतूदीनुसार मान्यताप्राप्त उत्पादकांकडून घेणे बंधनकारक राहील. | | | | |
| २.२.५<br>**९३२ गट** | **१.** गांडुळ खत युनिट उभारणी, (७ x ३ x १ फूट) रु.५०००/ प्रती युनिट याप्रमाणे १० x १० फूट पक्क्या जागेवर ७ x ३ x १ फूट विटाचे बांधकाम करुन युनिटची उभारणी योग्य प्रकारे सावली करुन करावी, त्यासाठी ४ किलो गांडूळ बिज वापर करावा. एका प्रकल्पात **३५ गांडूळ शेड** प्रति युनिट ५०००/ प्रमाणे उभारण्यात यावे. | १७५००० | ० | ० | १७५००० |
| २.२.५<br>**३२६ गट** | गांडूळ खत युनिट उभारणी, (७ x ३ x १ फूट) रु.५०००/ प्रती युनिट याप्रमाणे १० x १० फूट पक्क्या जागेवर ७ x ३ x १ फूट विटाचे बांधकाम करुन युनिटची उभारणी योग्य प्रकारे सावली करुन करावी, त्यासाठी ४ किलो गांडूळ बिज वापर करावा. एका प्रकल्पात **५० गांडूळ शेड** प्रति युनिट ५०००/ प्रमाणे उभारण्यात यावे. | २५०००० | ० | ० | २५०००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **तपशील -** गांडूळ खत युनिट उभारणीसाठी मदत करणे त्यामध्ये गांडूळ खत युनिट बांधकाम, गांडूळ बीज खरेदी, खड्डा खोदणे, मजूरी, पाणी देणे, इ. बाबीसाठी खर्च. गांडूळ खत युनिटसाठी लागणारे गांडूळ कृषी विभागाच्या कृषी चिकित्सालयातूनच खरेदी करावे. गांडूळ खत युनिट उभारणी केल्यानंतर कृषि सहाय्यक, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, गट प्रवर्तक यांनी त्याची तपासणी करुन अनुदान प्राप्तीसाठीच्या शिफ़ारसीनुसार प्रकल्प संचालक, आत्मा यांनी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थीचे नावे असलेल्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीव्दारे अदा करावी. | | | | |
| २.२.५<br>**९३२ गट** | **२. बायोडायनॅमिक सी.पी.पी.युनिट उभारणी**<br>एका प्रकल्पात २५ सी.पी.पी. युनिट (रु. १०००/- प्रति युनिट याप्रमाणे प्रति वर्ष तयार करावे) | २५००० | २५००० | २५००० | ७५००० |
| | **तपशील -** एक एकरासाठी एका वर्षाकरीता सी.पी.पी. युनिट तयार करण्याकरिता ३ x २ x १ फूट आकाराचे विटांचे कुंड तयार करावे त्यामध्ये गायीचे ६०किलो शेण आणि बायोडायनॅमिक मदर कल्चर वापरुन सी.पी.पी तयार करावा. सर्व प्रकारची बायोडायनॅमिक निविष्ठा बायोडायनॅमिक असोसिएशन ऑफ इंडियामार्फत प्रमाणित आणि एन.पी.ओ.पी. स्टॅंडर्ड प्रमाणित अधिकृत प्रमाणिकरण संस्थेकडून खरेदी करावी. बायोडायनॅमिक / सी.पी.पी. युनिट उभारणीनंतर संबधीत शेतक-यांस प्रकल्प संचालक, आत्मा यांनीअनुदानाचीरक्कम थेट लाभार्थीचे नावे असलेल्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीव्दारे अदा करावी. | | | | |
| **एकूण २.२ .... ९३२ गट** | | **२७५०००** | **७५०००** | **२५०००** | **३७५०००** |
| **एकूण २.२ .... ३२६ गट** | | **३२५०००** | **५००००** | **०** | **३७५०००** |
| **२.३** | **शेती अवजारे भाडयाने घेणे......** | | | | |
| २.३.१ | कृषि औजारे भाडयाने घेणे.<br>(i) नांगर (ii) Cono Weeder (iii) भात काढणी यंत्र<br>(iv) Furrrow Opener (v) फवारणी यंत्र<br>(vi) Rose Can (vii) Top Pan Balance | १५००० | १५००० | १५००० | ४५००० |
| | **तपशील -** Sub Mission on Agriculture Mechanization Organization अंतर्गत औजारे भाडे पुरवणी केंद्र स्थापन करण्यात आलेली आहेत. अशा केंद्रामधून औजारे भाडयाने घेऊन गटाने निवड केलेल्या शेतक-यांना वापरण्यास द्यावीत. गटाने औजारे केंद्रामार्फ़त प्रथम भाड्याने घ्यावीत व काम झाल्यानंतर शेतकरीनिहाय केलेल्या कामाचा तपशील संकलीत करुन त्यावर गट प्रमुख व कृषि सहाय्यक यांची शिफ़ारस घ्यावी व भाड्याची रक्कम केंद्राकडे वर्ग करण्यासंदर्भात शिफ़ारस करुन तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावी. तालुका कृषि अधिकारी व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी प्रकल्प संचालक, आत्मा यांच्याकडे शिफ़ारसीचे पत्र पाठवावे व त्यानुसार प्रकल्प संचालक, आत्मा यांनी संबधीत केंद्राना भाड्याची रक्कम वर्ग करावी. जर गटांच्या जवळपासच्या क्षेत्रात असे केंद्र अस्तित्वात नसेल तर गट प्रर्वतक यांनी स्थानिकरित्या अवजारे भाड्याने देण्या-या व्यक्तीमार्फ़त भाडे तत्वावर घ्यावीत व कृषि सहाय्यक यांच्या शिफ़ारसीनुसार तालुका कृषि अधिकारी यांनी संबधीत गटांना अनुदान वर्ग करण्याची शिफ़ारस प्रकल्प संचालक आत्मा यांना करावी.त्यांचेमार्फत अनुदानाची रक्कम थेट गटाचे नावे असलेल्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीव्दारे अदा करण्यात यावी. | | | | |
| **एकूण २.३** | | **१५०००** | **१५०००** | **१५०००** | **४५०००** |
| **२.४** | **सेंद्रिय उत्पादीत मालाचे पॅकेजींग, लेबलिंग आणि ब्रॅंडींग करणे ...** | | | | |
| २.४.१ | सेंद्रिय उत्पादनासाठी पीजीएस लोगो, पॅकींग साहित्य, होलोग्राम प्रिंटींग इत्यादी साठी.<br>रु.२५००/- प्रती एकर याप्रमाणे | ० | ६२५०० | ६२५०० | १२५००० |
| | **तपशील -** सेंद्रिय उत्पादनासाठी होलोग्राम प्रिंटींग असलेले पॅकींग साहित्य खरेदी करण्यासाठी मार्गदर्शक सुचनानुसार कृषि विभाग, प्रादेशिक परिषद अथवा मान्यताप्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत गट प्रवर्तक (ख्ड्घ) हे काम करेल त्यामध्ये सेंद्रिय उत्पादन हे पीजीएस ग्रीन आहे की पीजीएस इंडिया आहे याबाबत लोगो लिहिलेले असणे आवश्यक आहे. तसेच उत्पादकाचा कोड नंबर तालुका, जिल्हा,राज्य, लॉट नंबर, उत्पादनाची तारीख, आवश्यक अनुषंगिक सर्व माहिती असणे आवश्यक आहे.<br>निवड केलेल्या गटांना त्याच्या सेंद्रिय उत्पादनासाठी घ्क्र्‍ ख्द्दृढ़्‌ होलोग्राम प्रिंटींग करुन देण्याचे काम प्रादेशिक परिषदेने करावयाचे आहे. त्यासाठी द्वितीय व तृतीय वर्षी प्रतिगट ६२,५०० रुपये अनुदान हे प्रादेशिक परिषद यांना द्यावयाचे आहे. | | | | |

| अ.क्र. | घटक / बाब | अंदाजित अनुदानीत रक्कम रुपये | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण |
| २.४.२ | सेंद्रिय उत्पादन गटांस सेंद्रिय उत्पादीत मालाचे वाहतूक करणेसाठी वाहन खरेदी करणे (कमीत कमी १.५ टन क्षमता असलेल्या चारचाकी वाहनासाठी रु. १,२०,०००/- प्रती गट) | ० | १२०००० | ० | १२०००० |
| | **तपशील -** सेंद्रिय उत्पादन गटांस सेंद्रिय उत्पादनाची ने आण करण्यासाठी वाहन खरेदी करणे ..... (कमीत कमी १.५ टन क्षमता असलेल्या चारचाकी वाहनासाठी रु. १,२०,०००/- प्रती गटासाठी )<br>१) सेंद्रिय उत्पादन गटांस सेंद्रिय उत्पादनाचे दळणवळण करण्यासाठी किमान १.५ टन क्षमता असलेल्या चारचाकी वाहन खरेदीनंतर गटाच्या नावे द्यावयाचे आहे, त्यासाठी गटाने वाहन खरेदी केल्यानंतर गटाच्या नावे असलेले RC-Book/ वाहन खरेदीची पावती व कृषि सहाय्यक /मंडळ कृषि अधिकारी / तालुका कृषि अधिकारी/ तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांचे समवेत फ़ोटोसह मौका तपासणी अहवाल प्रकल्प संचालक आत्मा यांना पाठवावा व त्यानंतर प्रकल्प संचालक, आत्मा यांनी गटाच्या नावे अनुदानडीबीटीद्वारे अदा करावे.<br>२) बँक कर्जावर गटाला वाहन खरेदी करावयाचे असल्यास प्रकल्प संचालक, आत्मा यांनी इच्छुक गटास अनुदान उपलब्धतेचे पत्र द्यावे.<br>३ ) गटाचे तांत्रिक / आर्थिक अडचणीस्तव गटास सामूहिकरित्या वाहन खरेदी करणे शक्य नसल्यास गटामधील समाविष्ट सभासद अनुदाना व्यतिरिक्त रक्कम उभी करुन स्वत: वाहन खरेदी करु शकत असल्यास, गटाच्या सेंद्रिय मालाच्या वाहतुकीची हमी गटास करुन देत असल्यास गटाच्या शिफ़ारसीवरुन अनुदानाची रक्कम संबधीत सभासदाच्या नावे प्रकल्प संचालक. आत्मा यांनी देण्यास हरकत नाही, मात्र अशा ठिकाणी गटाने संबधीत व्यक्तीच्या नावाची शिफ़ारस प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या पुर्व-परवानगीने करण्यात यावी.<br>४) याच पध्दतीने गट ज्या शेतकरी उत्पादक कंपनीचा पुरस्कृत केलेला असेल व संबधीत शेतकरी उत्पादक कंपनी वाहन खरेदी करु शकत असेल तर प्रथम प्राधान्य शेतकरी उत्पादक कंपनी यांना देण्यात यावे. यासाठी देखील प्रकल्प संचालक, आत्मा यांची पुर्व-परवानगीने घेणे आवश्यक राहील.<br>५) सदरहू वाहनावर खरेदीनंतर खालील नमुन्यात दिल्याप्रमाणे ब्रॅडींग करणे आवश्यक राहील.<br>महाराष्ट्र शासन logo कृषि विभाग<br>राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान<br>परंपरागत कृषि विकास योजना (सेंद्रिय शेती) अंतर्गत<br>अर्थसहाय्यीत सेंद्रिय शेतीमाल वाहन गट/संस्था<br>६) सदरच्या वाहनासाठी लागणारा आवर्ती खर्च (चालक पगार, इंधन खर्च, दुरुस्ती खर्च इ. हा संबधीत लाभधारकाने करावयाचा आहे.<br>७ ) सदरहू वाहनातून कोणत्याही परिस्थितीत सेंद्रिय मालाव्यतिरिक्त इतर कोणत्याही मालाची वाहतूक किंवा विक्री न करण्याचे प्रतिज्ञापत्र प्र.स.आत्मा यांना देण्यात यावे. | | | | |
| २.४.३ | सेंद्रिय शेती विक्री मेळावा आयोजित करण्यासाठी. (जास्तीत जास्त रु.३६३३०/-प्रती गट) | ० | ३६३३० | ० | ३६३३० |
| | **तपशील -** सेंद्रिय शेती प्रोत्साहन म्हणून विविध सेंद्रिय शेतीचा मेळावा घेणे त्यामध्ये Stallउभे करणे, प्रदर्शन मांडणे इत्यादीसाठी तरतूद.<br>**(१)** सेंद्रिय पध्दतीने शेती करणा-या या गटामधील शेतक-यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून प्रकल्प संचालक, आत्मा यांनी जिल्हा स्तरावर सेंद्रिय शेतीमाल प्रदर्शन व विक्री आयोजित करावी, त्यासाठी जिल्हा स्तरावर सर्व गटाची तरतूद एकत्र करुन त्या निधीचा विनियोग एकत्रितरित्या जिल्हा स्तरावर करावा. यासाठी प्रदर्शनाची प्रसिद्धी, स्टॉलची उभारणी करणे, परिसंवादाचे आयोजन, जागेचे भाडे व इतर अनुषंगिक खर्च वित्त-वित्तीय नियमाचा अवलंब करुन प्रकल्प संचालक यांनी करावा. (२) राज्य तसेच देश पातळीवर होणा-या नामांकित सेंद्रिय शेतीमाल प्रदर्शनामध्ये सहभाग घेण्यासाठी प्रति गटासाठी उपलब्ध करुन दिलेल्या ३६,३३० पैकी ३३३० रुपयेप्रमाणे अनुदान राज्यस्तरावर ठेवण्यात येईल व त्या माध्यमातून योजनेंतर्गत निवड केलेल्या शेतक-यामार्फ़त राज्याचे प्रतिनिधीत्व करण्यात येईल | | | | |
| **एकूण २.४** | | **०** | **२१८८३०** | **६२५००** | **२८१३३०** |
| **एकूण एकंदर ..१३२ गटांसाठी** | | **६५६७४०** | **५२३६७०** | **३१४५९०** | **१४९५०००** |
| **एकूण एकंदर ..३२६ गटांसाठी** | | **७०६७४०** | **४९८६७०** | **२८९५९०** | **१४९५०००** |

**-------------+---+---+---+---+-------------**

१८.....

## जोडपत्र ‘ब’

## परंपरागत कृषि विकास योजनेंतर्गत प्रथम व द्वितीय टप्प्यातील जिल्हानिहाय गट/ समूह निर्मिती

| अ.क्र. | जिल्हा / विभाग | प्रथम टप्पा ९३२ गट | द्वितीय टप्पा ३२६ गट |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | १० | ७ |
| २ | पालघर | २२ | १२ |
| ३ | रायगड | ३४ | १० |
| ४ | रत्नागिरी | २८ | ५ |
| ५ | सिंधुदुर्ग | ३४ | २ |
| | **कोकण विभाग** | **१२८** | **३६** |
| ६ | नाशिक | ३८ | १८ |
| ७ | धुळे | १४ | १० |
| ८ | नंदूरबार | १८ | १० |
| ९ | जळगाव | ५० | १५ |
| | **नाशिक विभाग** | **१२०** | **५३** |
| १० | अहमदनगर | ३६ | १७ |
| ११ | पुणे | ४० | २२ |
| १२ | सोलापूर | २८ | ७ |
| | **पुणे विभाग** | **१०४** | **४६** |
| १३ | सातारा | २८ | ५ |
| १४ | सांगली | २६ | ७ |
| १५ | कोल्हापूर | ३० | ७ |
| | **कोल्हापूर विभाग** | **८४** | **१९** |
| १६ | औरंगाबाद | २४ | ६ |
| १७ | जालना | २२ | ६ |
| १८ | बीड | २८ | ६ |
| | **औरंगाबाद विभाग** | **७४** | **१८** |
| १९ | लातूर | २४ | १० |
| २० | उस्मानाबाद | २२ | १० |
| २१ | नांदेड | ३४ | १० |
| २२ | परभणी | २४ | ७ |
| २३ | हिंगोली | १४ | ६ |
| | **लातूर विभाग** | **११८** | **४३** |
| २४ | बुलढाणा | ३० | १५ |
| २५ | अकोला | १८ | १० |
| २६ | वाशिम | १८ | १० |
| २७ | अमरावती | ३२ | १२ |
| २८ | यवतमाळ | ३८ | ८ |
| | **अमरावती विभाग** | **१३६** | **५५** |
| २९ | वर्धा | २२ | ८ |
| ३० | नागपूर | ३२ | १४ |
| ३१ | भंडारा | २० | ५ |
| ३२ | गोंदिया | २० | १५ |
| ३३ | चंद्रपूर | ४८ | ९ |
| ३४ | गडचिरोली | २६ | ५ |
| | **नागपूर विभाग** | **१६८** | **५६** |
| | **एकूण महाराष्ट्र राज्य** | **९३२** | **३२६** |